

कुलगुरु कै. वि. गं. तथा दादासाहेब केतकर



धनुर्धारी श्रीराम लक्ष्मण

विद्वान सर्वत्र पूज्यते।

स्थापना १२ मे १९०९



शिक्षणमहर्षी कै. डॉ. ग. श्री. तथा अण्णासाहेब खैर


पुणे विद्यार्थी गृहाचे मासिक

# समाचार

Pune Vidyarthi Griha's 'Samachar' Magazine May 2025 - Pages - 60

संपादक : श्री. राजेंद्र विठ्ठल बोऱ्हाडे

कार्यकारी संपादक : श्री. सुभाष मल्लाप्पा जिर्गे

* पुणे * वर्ष ७६ * अंक ७ * किंमत रु. १०/- * वार्षिक वर्गणी रु. १००/-





दि. ७ एप्रिल २०२५ रोजी अभियांत्रिकी आणि श्रीकृष्ण सदाशिव धामणकर व्यवस्थापन महाविद्यालय, म्हसरूळ शाखा, नाशिक येथे ''अद्वैया २K२५'' वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे मा. श्री. रमेश चव्हाण, सहउपाध्यक्ष, किर्लोस्कर ऑईल इंजिन यांचा सत्कार करताना कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, समवेत देणगीदार श्रीमती सिंधुताई धामणकर, कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी, तसेच डावीकडे प्राचार्य सुरेश पाटील, प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे, प्राचार्य डॉ. मनोज भालेराव, उजवीकडे मुख्याध्यापिका सौ. मनीषा साठे आणि मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील

## ※ श्रीरामनवमी आणि कै. वि. गं. तथा दादासाहेब केतकर जयंती क्षणचित्रे ※



दि. ६ एप्रिल २०२५ रोजी
श्रीरामनवमीनिमित्त
संस्थेच्या श्री धनुर्धारी श्रीराम मंदिरात
श्रीराम लक्ष्मणास वंदन करताना
कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे आणि
कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी
समवेत गुरूजी श्री. आशिष राहूरकर



'सकलगुणनिधान पुरुषोत्तम श्रीराम'
या विषयावर प्रवचन करताना
डॉ. ऋजुता निहार वाळिंबे



श्रीरामचरित्रावर आधारित आणि
गीत रामायणातील काही गीते सादर
करताना कु. दलिका जोशी



डॉ. ऋजुता निहार वाळिंबे यांचा
सत्कार करताना
कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे



←
कु. दलिका जोशी आणि सहकारी
यांचा सत्कार करताना
उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी, समवेत
कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी



→
दि. ९ एप्रिल २०२५ रोजी
कुलगुरू कै. वि. गं. तथा दादासाहेब केतकर यांच्या
१३८ व्या जयंती निमित्त संस्थेच्या मुख्यालयातील
कै. दादांच्या पुतळ्यास संस्था पदाधिकारी
आणि संचालक यांनी अभिवादन केले.
कै. दादासाहेब केतकर यांच्या कार्याची माहिती देताना
कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, या प्रसंगी उपस्थित
संचालक श्री. सुनील रेडेकर, प्रा. राजेंद्र कडुसकर,
श्री. आनंद कुलकर्णी आणि श्री. रमेश कुलकर्णी

संपादकीय

# स्वातंत्र्यवीर सावरकरांना आदरांजली

भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या यज्ञकुंडातील एक समिधा म्हणजे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर.

सावरकरांचे जीवन जर आपण पाहिले तर,

**‘पदोपदी पसरून निखारे, आपुल्याच हाती**
**होवोनिया बेहोष धावलो ध्येयपथावरती**
**कधी न थांबलो विश्रांतीस्तव पाहिले न मागे**
**बांधू न शकले प्रीतीचे वा कीर्तीचे धागे**
**एकच तारा समोर होता पायतळी अंगार**
**आई पायतळी अंगार**
**गर्जा जयजयकार क्रांतीचा ! गर्जा जयजयकार’**

या मनोप्रवृत्तीला साजेसे होते.

महान क्रांतिकारक, समाजसुधारक, हिंदू संघटक, इतिहासकार, अलौकिक प्रतिभाशक्तीचे वरदान लाभलेला कवी असे विविध पैलूंनी नटलेले सावरकरांचे व्यक्तिमत्त्व होते.

इ. स. १८९७ मध्ये चाफेकर बंधूंना फाशीची शिक्षा झाली. या घटनेने सावरकरांच्या मनातील स्वातंत्र्योर्मी अधिकच तेजाळली. चाफेकरांच्या बलिदानावर त्यांनी ‘फटका’ लिहिला होता.

सावरकरांनी त्यांच्या वयाच्या पंधराव्या वर्षीच कुलस्वामिनीपुढे सशस्त्र क्रांती मार्गाने भारत स्वतंत्र करण्याची प्रतिज्ञा घेतली. इ. स. १८९९ मध्ये ‘राष्ट्रभक्ती समूह’ या क्रांतिकारी गुप्त संस्थेची स्थापना केली. त्यानंतर भारतीय स्वातंत्र्य लढ्यासाठी ‘मित्रमेळा’ या दुसऱ्या संस्थेचीही स्थापना केली. समाजात चैतन्य जागृत व्हावे म्हणून सार्वजनिक स्तरावर सावरकरांनी श्री छत्रपती शिवाजी महाराज उत्सव सुरू केला.

‘गतगोष्टींच्या आदराचे प्रतीक म्हणून नव्हे तर, ध्येयसिध्दीचे एक साधन म्हणून आम्ही या उत्सवाचा स्वीकार करत आहोत. गेलेले स्वातंत्र्य परत मिळवणारे एक थोर राष्ट्रवीर म्हणूनच शिवछत्रपती आम्हास वंद्य आणि स्मरणीय आहेत’ अशी श्रीमहाराजांच्या जीवन चरित्राकडे पाहण्याची सावरकरांची दृष्टी होती. भारतीय स्वातंत्र्याचे आद्य प्रणेते म्हणून श्री छत्रपती शिवाजी महाराजांचे स्थान आपल्या समाजात अढळ आहे असे सावरकरांचे मत होते.

भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीसाठी १९०४ मध्ये अभिनव भारत या संघटनेची सावरकरांनी स्थापना केली. वंगभंग चळवळीत ते सहभागी झाले होते. विलायती मालावर बहिष्कार आणि विलायती मालाच्या होळीत सावरकर अग्रणी होते. पुढे बॅरिस्टर पदवीच्या अभ्यासासाठी ते इंग्लडला गेले. तेथेही त्यांचे क्रांतीकार्य सुरूच होते.

इंग्लडच्या वास्तव्यात ‘जोसेफ मॅझिनी यांचे आत्मवृत्त व राजकारण’ हा ग्रंथ त्यांनी लिहिला. त्यातील स्वातंत्र्योर्मी चित्रणाने तत्कालीन इंग्रज सरकारने या ग्रंथावर बंदी घातली. १८५७ च्या स्वातंत्र्यसंग्रामाला

पन्नास वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्ताने आणि १८५७ चे स्वातंत्र्यसमर म्हणजे केवळ शिपायांची भाऊगर्दी होती हा समाज मानसातील गैरसमज दूर करण्यासाठी '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' हा ग्रंथ त्यांनी लिहिला. या ग्रंथांचे इंग्रजीत भाषांतर करून ते हॉलंड येथे छापून घेतले. त्यानंतर सावरकरांनी शिखांचा इतिहासही लिहिला.

१८५७ च्या स्मृती महोत्सव समारंभाला गांधीजी उपस्थित होते. तेव्हा गांधीजी म्हणाले होते 'काही मतभिन्नता असली तरी मला सावरकरांसंन्निध्द बसण्याची संधी मिळाली याबद्दल मला अभिमान वाटतो. त्यांच्या स्वार्थत्यागाची व देशभक्तीची मधुर फळे आपल्या देशाला दीर्घकाळ लाभोत.' महात्मा गांधीजींच्या या भाष्यातून त्यांच्या मनातले सावरकरांते स्थान आपल्याला जाणवते.

आपल्या संस्कृती आणि तत्त्वज्ञानाचा सावरकरांना अतिशय अभिमान होता. म्हणूनच सावरकरांना दोन जन्मठेपींची शिक्षा सुनावल्यानंतर तत्कालीन न्यायाधीश म्हणाले होते की, सावरकर तुम्ही या जन्मात एक शिक्षा भोगा व दुसरी शिक्षा पुढल्या जन्मात भोगा. तुम्ही कितीही प्रयत्न केलेत तरी, तुम्ही आमची सत्ता उलथून टाकू शकणार नाही, हेच त्या न्यायाधिशांना सूचित करावयाचे होते पण, त्या महाभयंकर शिक्षेने जराही विचलीत न झालेले सावरकर तत्काळ उद्गारले होते, 'महाशय धन्यवाद, निदान या निमित्ताने तरी तुम्ही हिंदूधर्मातल्या पुनर्जन्माच्या सिध्दान्तावर विश्वास ठेवलात. मी तुमचा आभारी आहे.'

अंदमानात छिलका कुटणे, काथ्या वळणे, कोलू पिसणे आदी अति कष्टप्रद कामे त्यांनी केली. त्या नरकतुल्य यातना भोगत असतानाही अंदमानात सावरकरांनी 'कमला' सारखे नितांतसुंदर काव्य लिहिले. अंदमानातही त्यांनी राजबंद्यांची संघटना बांधली. कैद्यांच्या हक्कांसाठीची ही एकजूट होती. अंदमानातून झालेल्या सशर्त मुक्ततेमुळे रत्नागिरीत मुक्कामाला असतां राजकीय चळवळीत भाग घ्यायला बंदी असल्याने सावरकरांनी समाजसुधारणेचे कार्य हाती घेतले. रत्नागिरीच्या सार्वजनिक जीवनातील अस्पृश्यता व रोटीबंदीचे उच्चाटन केले. लिपीशुध्दी व भाषाशुध्दी आंदोलन उभारले. श्री भागोजी कीर यांचे पतीतपावन मंदिर अस्पृश्यांसह सर्वांना खुले केले.

केवळ राजकीय क्रांती ही खरी क्रांती नसून समाजाच्या मूलतत्त्वात आमूलाग्र परिवर्तन हीच खरी क्रांती. अशा संपूर्ण क्रांतीसाठी सावरकर आमरण झटले. मातृभूमी आणि मातृभूमीचे स्वातंत्र्य हे प्रत्येक नागरिकाच्या मनातील मानबिंदू असले पाहिजे.

**' तुजसाठी मरण ते जनन,**
**तुजविण जनन ते मरण'**

या निष्ठेने प्रत्येक देशवासी जगत राहिला तर, 'बलसागर भारत' साकार होण्यास फार काळ लागणार नाही असे सावरकर सांगतात.

स्वातंत्र्यवीर सावरकरांना शत् शत् नमन ।

दि. ३० एप्रिल २०२५
अक्षय तृतीया

## संस्थेच्या धनुर्धारी श्री राम मंदिरामध्ये श्रीराम जन्मोत्सव साजरा

**कोषाध्यक्ष – श्री. कृष्णाजी कुलकर्णी**

संस्थेच्या दरवर्षीच्या प्रथेप्रमाणे रविवार दि. ६ एप्रिल २०२५ रोजी चैत्र शुद्ध ९ ला (श्रीराम नवमी) श्रीराम जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. या दिवशी सकाळी ९.०० ते १०.०० या वेळेत कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांचे शुभहस्ते श्रीराम-लक्ष्मणास पुरुषसूक्ताचे आवर्तन करून अभिषेक करण्यात आला. विधिवत पूजा करून श्रीराम-लक्ष्मणास पुष्पहार अर्पण करून नैवेद्य दाखविण्यात आला.

अभिषेकानंतर सकाळी १०.४० ते १२.१५ या वेळेत डॉ. ऋजुता निहार वाळिंबे यांचे 'सकलगुणनिधान पुरुषोत्तम श्रीराम' या विषयावर प्रवचन आयोजित करण्यात आले. प्रथम श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांचे शुभहस्ते डॉ. ऋजुता वाळिंबे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. श्रीरामाचा जन्म व श्रीरामदास स्वामींचा जन्म तिथी एकच असल्याचे सांगून श्रीरामायणातील अनेक दाखले देवून श्रीरामाच्या विविध गुणांची माहिती आश्रमीय विद्यार्थ्यांना त्यांनी सांगितली. सर्व संपन्न, सकलगुणनिधान श्रीरामाच्या गुणाचे आपण सर्वांनी व्यवहारात आचरण करणे गरजेचे आहे. सकल गुणनिधान पुरुषोत्तम श्रीराम या विषयावर आपले विचार प्रगट करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. यानंतर श्रीराम लक्ष्मणाची आरती करून सर्वांना तीर्थ व सुंठवडा प्रसादाचे वाटप करण्यात आले.

कु. दलिका जोशी यांनी सकाळी १२.१५ ते १२.४० या वेळेत श्रीरामचरित्रावर आधारित आणि गीत रामायणातील काही गीते सादर केली. त्यांच्या सुमधुर गायनाने सर्व श्रोते मंत्रमुग्ध झाले. संस्थेचे उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांचे हस्ते कु. दलिका जोशी यांचे पुष्पगुच्छ देऊन आभार मानण्यात आले. सर्व उपस्थित भक्तांनी श्रीराम लक्ष्मणास फुले अर्पण करून त्यांचा कृपाशीर्वाद घेतला.

सायंकाळी ४ ते ६ या वेळेत गीता भगिनी यांचा संपूर्ण गीता पठणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमप्रसंगी गीता भगिनींना पुष्पगुच्छ देऊन श्री. सुनील रेडेकर यांनी आभार मानले.

रात्री ८ ते ९.३० या वेळेत ओंकार नाद संस्थेच्या सौ. मोहिनी सोहोनी, सौ. अश्विनी काशीकर व सौ. ज्योत्स्ना देव व अन्य सहकारी यांनी हे 'शिवशंकरा गिरीजात्मका' या गीताने भक्तीगीतास सुरूवात केली. 'सावळा ग रामचंद्र', 'रामा रघुनंदना', 'आज अयोध्या सजली', 'सेतू बांधारे' अशा प्रकारची गीते सादर केली. संचालक श्री. सुनील रेडेकर यांनी सौ. मोहिनी सोहोनी, सौ. अश्विनी काशीकर यांचा यथोचित सत्कार केला.

या रामजन्मोत्सवासाठी संस्थेचे देणगीदार, माजी विद्यार्थी, संस्था पदाधिकारी, संचालक, विविध विभागातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, आश्रमस्थ विद्यार्थी व या परिसरातील श्रीराम भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

***

## कै. वि. गं. तथा दादासाहेब केतकर यांची जयंती

**कोषाध्यक्ष – श्री. कृष्णाजी कुलकर्णी**



कुलगुरू कै. दादासाहेब केतकर

कै. विष्णु गंगाधर तथा दादासाहेब केतकर यांची दि. ९ एप्रिल २०२५ रोजी १३८ वी जयंती साजरी करण्यात आली.

संस्थेच्या मुख्यालयातील कै. दादासाहेब केतकर यांच्या पुतळ्यास संचालक श्री. आनंद कुलकर्णी व संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर यांचे शुभहस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.

याप्रसंगी कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी यांनी उपस्थितांचे स्वागत व प्रास्ताविक केले. सध्याच्या आश्रमस्थ विद्यार्थ्यांना कुलगुरू दादासाहेब केतकर यांनी केलेल्या महान कार्याची माहिती सांगितली. सर्व विद्यार्थ्यांनी चांगले शिक्षण घेऊन स्वतःचे, आपल्या पालकांचे आणि राष्ट्राचे नाव उज्वल करा असा शुभ संदेश दिला आणि कार्यक्रमाची सांगता झाली.

या कार्यक्रम प्रसंगी संस्थेचे संचालक, सेवक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ***

## शेजारधर्म

समाजात राहणाऱ्या कुटुंबाला शेजार टाळणे शक्य नाही. तुम्ही शेतात राहा, स्वतंत्र बंगल्यात राहा किंवा गजबजलेल्या चाळीत राहा. जवळ किंवा लांब, शेजार हा राहाणारच.

शेजाऱ्यांचे परस्परसंबंध समाजसुखाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहेत. धर्माच्या नियमाइतकेच महत्त्व त्यांना आहे. म्हणूनच अनुभवी लोकांनी ''शेजार-धर्म'' असा शब्द रूढ केला आहे.

सहिष्णुता हा पहिला गुण शेजारी या नात्याने आपल्या ठिकाणी वाढविला पाहिजे. प्रत्येक कुटुंबाला त्याची त्याची एक संस्कृती असते. आपल्या कौटुंबिक संस्कृतीपेक्षा ती थोडी निराळी दिसली की, उपहास, तिरस्कार आणि असहिष्णुता या भावना जागृत होतात. त्यांना आळा घातला पाहिजे. ''व्यक्ती तितक्या प्रकृती'' त्याचप्रमाणे ''कुटुंबे तितक्या संस्कृती'' असे म्हणून उदारपणा व सहिष्णुता दाखवावी. घेण्यासारख्या गोष्टी घ्याव्यात. इतरांकडे काणाडोळा करावा. शेजारणी बायकांनी ही गोष्ट विशेषकरून लक्षात ठेवावयास पाहिजे, म्हणजे त्यांची भांडणे कमी होतील.

शेजाऱ्यांच्या सोयी-गैरसोयी पाहून आपली राहणी ठेवणे अगदी जरुरीचे आहे. आपल्यापासून शेजाऱ्याला त्रास, उपद्रव होऊ नये; बुद्धिपुरःसर किंवा नकळत कोणत्याही प्रकाराने. 'हा आपला धर्म आहे,' इतक्या पवित्रपणाने हे व्रत पाळा.

याच व्रताची दुसरी विधायक व कर्मप्रधान अशीही बाजू आहे. शेजाऱ्याच्या उपयोगी पडण्याची संधी व प्रसंग वाया घालवू नका. शेजाऱ्यावर केलेला ''उपकार'' हा बँकेत टाकलेल्या शिलकेसारखा आहे. पुढे तुमच्या जरुरीच्या वेळेस तो उपयोगी पडेल.

तुम्ही म्हणाल, इतका ''धर्म'' पाळला तरी त्याची जाणीव ठेवणारे शेजारीही तसेच पाहिजेत. कधी असतील, कधी नसतील! म्हणूनच शेजार-धर्माला ''धर्म'' म्हटले आहे. तो निष्कामवृत्तीनेच पाळावयाचा असतो. निव्वळ देवाण-घेवाणीच्या स्वरूपाचा तो असता तर त्याला ''शेजार-व्यवहार'' असा शब्दप्रयोग केला असता!

**डॉ. ग. श्री. खैर (मे १९५७)**

# महाराष्ट्र मुद्रण तंत्र संस्था, पुणे

**संचालक : डॉ. राजेंद्र संपत कांबळे**
**प्र. प्राचार्य : प्रा. पी. व्ही. शिंदे**

### अतिथी व्याख्यान

दि. १२ मार्च २०२५ रोजी डॉ. वर्षा चावरे यांचे 'प्रिंटेड इलेक्ट्रॉनिक्स' या विषयावर अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांना 'प्रिंटेड इलेक्ट्रॉनिक्स' या अभ्यासक्रमातील विषय डॉक्टर चावरे यांनी विविध नमुने दाखवून समजावून सांगितला. तसेच 'प्रिंटिंग इंडस्ट्री' मधील उपलब्ध असलेल्या नोकरीच्या विविध संधी आणि नव्याने सुरू असलेले संशोधन याविषयी माहिती दिली. या व्याख्यानासाठी द्वितीय वर्षातील सुमारे ६० विद्यार्थी उपस्थित होते. प्राध्यापक श्री. राजेश जाधव यांनी सदर व्याख्यानाचे संयोजन केले.

### औद्योगिक भेट

✻ दि. १७ व १८ मार्च २०२५ रोजी द्वितीय वर्षातील विद्यार्थी दोन गटांमध्ये 'सुनिर्माण ग्राफिक्स' पुणे येथे औद्योगिक भेटीसाठी गेले होते. द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांना 'डिजिटल प्रिंटिंग' या अभ्यासक्रमातील विषयाच्या विविध प्रिंटिंग चे नमुने कसे प्रिंट होतात, तसेच 'प्री प्रेस'मध्ये कशाप्रकारे काम केले जाते, याविषयी माहिती मिळाली. या औद्योगिक भेटीसाठी द्वितीय वर्षातील ३९ विद्यार्थी उपस्थित होते. या औद्योगिक भेटीचे संयोजन प्राध्यापक कु. जान्हवी प्रभुणे यांनी केले.

✻ दि. २४ मार्च २०२५ रोजी प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांची 'युनिक लेबल' नऱ्हे, पुणे येथे औद्योगिक भेट आयोजित करण्यात आली होती. या औद्योगिक भेटीमध्ये विद्यार्थ्यांना स्क्रीन या विषयासंबंधीत केंद्र सामग्री व छपाई जवळून पहावयास मिळाली. तसेच पर्यावरण पूरक तंत्रज्ञानाविषयी माहिती मिळाली. कंपनीचे चेअरमन श्री. पद्माकर खके यांनी 'स्क्रीन प्रिंटिंग' मधील नवीन संधी बाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या औद्योगिक भेटीचे संयोजन श्री. एस. पी. बाविस्कर व श्री. आर. एल. गभाले यांनी केले.

### राष्ट्रीय सेवा योजना

दि. २० मार्च २०२५ रोजी राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी पर्वती टेकडी, पुणे येथे 'प्लास्टिक संकलन मोहीम' आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक तसेच पर्यावरण संबंधित विविध समस्यांची जाणीव व्हावी, हा या उपक्रमाचा उद्देश होता. प्रथम वर्षातील ३० विद्यार्थी यामध्ये सहभागी झाले होते. प्रा. श्री. अक्षय रावेतकर, प्रा. श्री. शंकर श्रीकांत व प्रा. श्री. राजेश जाधव यांनी सदरील कार्यक्रमाचे संयोजन केले.

### ग्रीन क्लब उपक्रम

'ग्रीन क्लब २०२४-२०२५' अंतर्गत विद्यार्थ्यांनी वर्षभरामध्ये विविध उपक्रम राबवले. याअंतर्गत पर्यावरणाबद्दल विद्यार्थ्यांमध्ये जागृती व्हावी यासाठी वृक्षारोपण करण्यात आले. प्रथम वर्षातील ३० विद्यार्थी या उपक्रमामध्ये सहभागी झाले होते. प्राध्यापक श्री. शंकर शेळकंदे यांनी ग्रीन क्लब उपक्रमाचे संयोजन केले.

### शैक्षणिक वर्ष २०२४ - २०२५ बाह्य आवेक्षण

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ मुंबई यांच्या वतीने दि. २६ मार्च २०२५ रोजी चार सदस्य समितीने संस्थेतील शैक्षणिक कामकाजाचे आवेक्षण केले. सदर समितीने शैक्षणिक कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले.

✻✻✻

# महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे

**संचालक : डॉ. राजेंद्र सं. कांबळे**
**प्राचार्य : श्री. व्ही. पी. गावडे**

## एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन

बुधवार दि. ५ मार्च २०२५ रोजी खगोलविश्व च्या रौप्य महोत्सवानिमित्त खगोलविश्व आणि रोटरी क्लब ऑफ पुणे (कर्वेनगर) यांच्या संयुक्त विद्यमाने इ. ८ वी ते इ. ११ वी च्या विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय खगोलशास्त्र या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

या कार्यक्रमास रोटरी क्लबचे अध्यक्ष श्री. दीपक थिटे, सौ. आशा आमोणकर, 'खगोल विश्व'चे संस्थापक श्री. मयुरेश प्रभुणे, सौ. सुप्रिया प्रभुणे, श्री. शरद भालेराव यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यशाळेत १५० हून अधिक विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

श्री. मयुरेश प्रभुणे यांनी विद्यार्थ्यांना स्लाईड शो आणि फिल्मसह खगोलशास्त्रावर सखोल मार्गदर्शन केले. तसेच खगोलशास्त्रातील करिअरच्या संधीविषयी माहिती दिली. विद्यार्थ्यांना टेलिस्कोपमधून सूर्य, चंद्र, गुरू आणि शुक्र ग्रह दाखविण्यात आले. प्राचार्य व्ही. पी. गावडे यांनी त्यांच्या मार्गदर्शनपर भाषणातून विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना सांगितले की या कार्यशाळेमधून नक्कीच उद्याचे खगोलशास्त्रज्ञ घडतील. प्राध्यापिका सौ. रूपाली चौथाई यांनी या कार्यशाळेसाठी विशेष प्रयत्न केले. तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवकांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य व्ही. पी. गावडे यांनी केले. कनिष्ठ महाविद्यालयाच्या कोऑर्डिनेटर सौ. रूपाली चौथाई यांनी आभारप्रदर्शन केले.

## वर्धापनदिन उत्साहात संपन्न

सोमवार दि. १७ मार्च २०२५ रोजी महाराष्ट्र विद्यालयाचा १०४ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे संचालक डॉ. राजेंद्र कांबळे होते. तसेच कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, संचालक श्री. रमेश कुलकर्णी व प्रा. राजेंद्र कडुसकर हे उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या आरंभी कुलगुरू कै. दादासाहेब केतकर व महाराष्ट्र विद्यालयाचे संस्थापक गुरूवर्य कै. ग. श्री. तथा अण्णासाहेब खैर यांची प्रतिमा पालखीत ठेऊन इ. ९ वी च्या विद्यार्थ्यांनी लेझीमवर नृत्य करत मिरवणूक काढली. या प्रसंगी कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, संचालक श्री. रमेश कुलकर्णी व प्रा. राजेंद्र कडुसकर यांनी कुलगुरू कै. दादासाहेब केतकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला. तसेच गुरूवर्य कै. ग. श्री. तथा अण्णासाहेब खैर व कुलगुरू  कै. वि. गं. तथा दादासाहेब केतकर यांच्या प्रतिमेस व तिथीनुसार शिवजयंती असल्यामुळे छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. यानंतर ईशस्तवनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्राचार्य व्ही. पी. गावडे यांनी केले. कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, संचालक डॉ. राजेंद्र कांबळे, श्री. रमेश कुलकर्णी व प्रा. राजेंद्र कडुसकर यांचा सत्कार प्राचार्य व्ही. पी. गावडे यांच्या हस्ते तुळशीचे रोप देऊन करण्यात आला. कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी यांच्या हस्ते प्राचार्य व्ही. पी. गावडे यांचा सत्कार तुळशीचे रोप देऊन करण्यात आला.

संचालक डॉ. राजेंद्र कांबळे आणि प्रा. राजेंद्र कडुसकर यांनी महाराष्ट्र विद्यालय वर्धापनदिनानिमित्त आपले मनोगत व्यक्त केले. यानंतर वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त घेण्यात आलेल्या क्रीडा स्पर्धा, बौध्दिक स्पर्धा, सुंदर हस्ताक्षर स्पर्धा, संस्कृत पाठांतर स्पर्धा अशा विविध स्पर्धांमध्ये तसेच जिल्हास्तरीय नृत्याविष्कार स्पर्धेत सहभागी झालेल्या इ. ५ वी, ६वी च्या यशस्वी विद्यार्थ्यांना सर्व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तिपत्रके देण्यात आली.

संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त घर घर संविधान या उपक्रमांतर्गत संविधानिक आदर्श व मूल्यांची ओळख करून देण्याच्या उद्देशाने घेण्यात

आलेल्या राज्यस्तरीय संविधान गुण गौरव परीक्षा २०२४ - २५ या उपक्रमात प्रशालेतील इ. ५ वी ते ११ वी च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये प्रशालेतील एकूण ४५० विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय संविधान गुण गौरव परीक्षा दिली. सदर उपक्रमात प्रशालेने विशेष सहभाग घेतल्याबद्दल प्रशालेस याप्रसंगी सन्मानचिन्ह, प्रशस्तिपत्रक देण्यात आले.

प्रशालेच्या वर्धापनदिनानिमित्त प्रशालेस मिळालेले सन्मानचिन्ह, प्रशस्तिपत्रक संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर यांच्या हस्ते प्राचार्य व्ही. पी. गावडे यांना देण्यात आले. तसेच एम. सी. व्ही. सी. अध्यापक श्री. मल्लिनाथ वाघमोडे यांनाही राज्यस्तरीय संविधान गुण गौरव परीक्षा २०२४ -२५ या उपक्रमात कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतल्याबद्दल संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर यांच्या हस्ते संविधान गुण गौरव समितीतर्फे कनिष्ठ महाविद्यालयाला मिळालेले सन्मानचिन्ह, प्रशस्तिपत्रक देण्यात आले. संविधान गुण गौरव समितीतर्फे प्राप्त झालेले प्रशस्तीपत्रक अध्यापिका सौ. सविता जगताप यांना संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर यांच्या हस्ते देण्यात आले. वार्षिक क्रीडा स्पर्धा, बौध्दिक स्पर्धांच्या पारितोषिकांच्या यादीचे वाचन माध्यमिक विभागाच्या अध्यापिका सौ. सुनंदा भाईक व कनिष्ठ महाविद्यालयाच्या अध्यापिका प्रियंका चिलका यांनी केले. कनिष्ठ महाविद्यालयाच्या अध्यापिका सौ. कीर्ती राठोड यांनी अभारप्रदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अध्यापिका सौ. सविता जगताप यांनी केले. फलकलेखन अध्यापक श्री. युवराज मिरखलकर यांनी केले. कार्यक्रम पत्रिका अध्यापक श्री. विठ्ठल अनभुले यांनी तयार केली. सौ. सविता जगताप, सौ. सुनंदा भाईक, सौ. रोशनी गायकवाड व इ. ९ ब च्या विद्यार्थिनींनी या प्रसंगी सुंदर रांगोळी काढली होती. या प्रसंगी सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# मुक्तांगण इंग्लिश मिडियम स्कूल, सदाशिव पेठ शाखा, पुणे ३०

**संचालक : डॉ. राजेंद्र सं. कांबळे**
**मुख्याध्यापिका : सौ. शिल्पा चितारे (प्राथमिक)**
**मुख्याध्यापिका : सौ. मधुमती कदम (माध्यमिक)**

**अभिनंदनीय**

दि. २ एप्रिल २०२५ रोजी पुणे सार्वजनिक सभा या ऐतिहासिक संस्थेचा १५५ वा वर्धापन दिनी सहाय्यक शिक्षिका सौ. प्राजक्ता मुरमट्टी यांना 'आदर्श शिक्षक पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी मुख्याध्यापिका मधुमती कदम आणि सौ. प्राजक्ता मुरमट्टी यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

**सौ. प्राजक्ता मुरमट्टी यांचे संस्थेच्या वतीने हार्दीक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !** ***

## ✻ नम्र विनंती ✻

**देणगीदार व हितचिंतक यांनी संस्थेच्या बँक खात्यावर ऑनलाईन देणगी रक्कम पाठविल्यानंतर कृपया संस्थेच्या ई-मेल आयडीवर किंवा संस्थेच्या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधून, देणगी देणाऱ्याचे पूर्ण नाव, पत्ता व देणगी देण्याचे निमित्त आणि विनियोग इ. माहिती कळवावी. तसेच पॅन कार्डची प्रत पाठवावी. बँकेत देणगी रक्कम जमा झाल्यावर फक्त रक्कम समजते. बाकी सविस्तर माहिती कळत नाही.**

**ई-मेल : pvgheadoffice@gmail.com**
**दूरध्वनी क्रमांक : ०२०-२४४७०९२७ / २४४७०५७३**
**मोबाईल क्रमांक : ९६९९८७६२०३**

राजेंद्र बोऱ्हाडे
कार्याध्यक्ष

## ❊ महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे ❊





खगोलशास्त्र या विषयावर आयोजित कार्यशाळेमध्ये टेलिस्कोपमधून
सूर्य, चंद्र, गुरू आणि शुक्र ग्रहांची पाहणी करताना विद्यार्थी




खगोलशास्त्र या विषयावर आयोजित कार्यशाळाप्रसंगी
रोटरी क्लब ऑफ कर्वेनगरचे प्रेसिडेंट
श्री. दीपक थिटे यांचा सत्कार करताना
प्राचार्य व्ही. पी. गावडे, समवेत डावीकडे
रोटरी क्लब सदस्या सौ. आशा आमोणकर,
श्री. मयुरेश प्रभुणे




पुणे पूर्व-पश्चिम ५२ व्या शहरस्तरीय विज्ञान प्रदर्शन २०२४- २५ मध्ये निबंध स्पर्धेत तृतीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या कु. आर्या शशांक गुप्ते, इ. ११ वी हिला प्रशस्तीपत्रक व स्मृतिचिन्ह देताना प्राचार्य व्ही. पी. गावडे, समवेत अध्यापक वर्ग

# मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे ९

**संचालक : श्री. आनंद कुलकर्णी**
**उपकार्याध्यक्ष : श्री. एस. एम. जिर्गे**
**प्राचार्या : सौ. सुप्रिया देशकुलकर्णी**
**मुख्याध्यापिका : सौ. रेखा बाली**

## पूर्व प्राथमिक विभाग

### महिना अखेर उपक्रम

शुक्रवार दि. २८ फेब्रुवारी २०२५ रोजी महिना अखेर उपक्रमांतर्गत समर डे साजरा करण्यात आला. या दिवशी सर्व विद्यार्थी दप्तर न घेता शाळेत आले होते. तसेच त्यांनी हलके सुती कपडे, टोपी व गॉगल परिधान केले होते.

या दिवशी सर्व विद्यार्थ्यांनी डब्यात संत्री, द्राक्षे, कलिंगड, टरबूज, खरबूज, स्ट्रॅाबेरी अशी उन्हाळी फळे आणली होती. तसेच विद्यार्थ्यांनी वॉटर बॅग मध्ये निरनिराळी सरबते आणली होती.

शिशु गटातील विद्यार्थ्यांनी संत्रे सोलण्याचा उपक्रम केला, तसेच पेपर प्लेट पासून नारळाचे झाड बनवून त्याला नारळाच्या आकाराचे कागद चिकटविले. छोट्या गटातील विद्यार्थ्यांनीही संत्रे सोलण्याचा उपक्रम केला, तसेच आईस्क्रिमच्या काडीवर आईस्क्रिमचा आकार चिकटवून पेपर बॉल्स व थर्माकोल बॉल्सच्या सहाय्याने ते सजविले.

शिक्षिका सौ. दीपाली पाध्ये यांनी तयार केलेली उन्हाळा या ऋतुची माहिती देणारी सुंदर पीपीटी यावेळी स्मार्ट बोर्डवर दाखविण्यात आली.

### द्वितीय सत्र परीक्षा

विभागाची द्वितीय सत्र परीक्षा गुरूवार दि. २० मार्च २०२५ ते शुक्रवार दि. २८ मार्च २०२५ या दरम्यान घेण्यात आली.

## प्राथमिक विभाग

### ग्रह, तारे निरीक्षण उपक्रम

शुक्रवार दि. २८ फेब्रुवारी २०२५ रोजी इ. ५ वी व इ. ६ वी च्या विद्यार्थ्यांसाठी तारांगणातील काही ग्रह, तारे निरीक्षण हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. सोमवार दि. ३ मार्च २०२५ रोजी इ. ३ री व इ. ४ थी आणि शुक्रवार दि. ७ मार्च २०२५ रोजी इ. १ ली व इ. २ री साठी हा उपक्रम घेतला गेला. सर्व विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेऊन ग्रह, तारे निरिक्षणाचा आनंद घेतला.

### मराठी दिन उत्साहात साजरा

सोमवार दि. ३ मार्च २०२५ रोजी प्राथमिक विभागात मराठी दिन साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी त्यांच्या सादरीकरणानुसार वेशभूषा करून अतिशय उत्साहात हा कार्यक्रम पार पडला. कविवर्य वि. वा. शिरवाडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मुख्याध्यापिका सौ. रेखा बाली व पर्यवेक्षिका सौ. स्वाती महाजन आणि सौ. मनीषा नाईक यांनी केले. याप्रसंगी सर्व मराठी विषयाच्या शिक्षिका व विद्यार्थी उपस्थित होते.

शनिवार दि. ८ मार्च २०२५ रोजी शिक्षण विभाग प्राथमिक व पुणे महानगरपालिका यांच्यातर्फे स्वच्छता मोहिम राबवण्यात आली. प्राथमिक विभागातील विद्यार्थी, शिक्षिका, पर्यवेक्षिका यांनी या मोहिमेत सहभाग घेतला होता.

## माध्यमिक विभाग

### मराठी भाषा गौरव दिन

दि. २७ फेब्रुवारी २०२५ रोजी शाळेत मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने राजभाषेची प्रतिज्ञा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचे महत्त्व सांगत मराठी भाषा गौरवगीत गायले. इ. ७ वी व ८ वी च्या विद्यार्थ्यांनी मराठी घोषवाक्ये देत ग्रंथदिंडी काढली.

## राष्ट्रीय विज्ञान दिवस

दि. २८ फेब्रुवारी २०२५ रोजी शाळेत राष्ट्रीय विज्ञान दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी विज्ञान दिवसाचे महत्त्व सांगितले. सर्व वर्गांमधून थोर शास्त्रज्ञ डॉ. सी. व्ही. रमण यांचे विज्ञानातील कार्यकर्तृत्व दर्शविणारी चित्रफीत विद्यार्थ्यांना दाखविण्यात आली.

दि. १ मार्च २०२५ रोजी शाळेतील नेचर क्लबच्या विद्यार्थ्यांनी फर्ग्युसन महाविद्यालयाच्या बोटॅनिकल गार्डनला भेट दिली. यावेळी वृक्षसंवर्धिनी संस्थेच्या संस्थापक सदस्या श्रीमती प्रिया भिडे यांनी शहरामध्ये अशा वनस्पती उद्यानांची गरज का आहे ? आणि नैसर्गिक परिसंस्थेचे संरक्षण कसे करावे याची माहिती विद्यार्थ्यांना दिली. यावेळी विद्यार्थ्यांबरोबर शिक्षिका प्राची कोल्हटकर आणि विद्या सालेहित्तल उपस्थित होत्या.

दि. ३ मार्च २०२५ रोजी इ. ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी शाळेतील एन. सी. सी. कॅडेट सार्जंट मेजर सृष्टी धनवडे हिचे आरडीसी कॅम्प निवड प्रक्रिया याविषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून शाळेमध्ये विविध स्पर्धा व उपक्रम राबविण्यात येतात. अशीच एक स्पर्धा म्हणजे स्वच्छ वर्ग स्पर्धा. २०२४ - २५ या वर्षीचा विजेतेपदाचा चषक इयत्तेप्रमाणे अनुक्रमे इ. ७ वी ड, इ. ८ वी अ, इ. ९ वी ड या वर्गांना देण्यात आला. या वर्गाच्या वर्गशिक्षिका अनुक्रमे सौ. माधुरी शिंदे, सौ. तन्मया सहस्त्रबुध्दे आणि सौ. कुमुदिनी पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## माध्यमिक विभाग

### प्रथमोपचार कार्यशाळेचे आयोजन

दि. २२ मार्च २०२५ रोजी इ. ८ वी आणि इ. ९ वी च्या एन. सी. सी. कॅडेटसाठी श्वास टिम आणि नायर हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने प्रथमोपचार कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यावेळी श्वास ग्रुपच्या संचालिका कु. रुची सेठी, डॉ. सचिनदेव सोनवणे, श्री. अभिजित सहस्त्रबुध्दे, श्री. जॉनी मनुजा यांनी विद्यार्थ्यांना प्रथमोपचाराविषयी मार्गदर्शन केले. यामध्ये एखादी व्यक्ती बेशुध्द पडली तर प्रथमोपचार कसा करावा, मधमाशीने डंख केल्यावर कसे प्रथमोपचार करावे, एखाद्या व्यक्तीला हार्ट ॲटॅक आल्यावर सी. पी. आर. कसा द्यावा याची वेगवेगळी प्रात्यक्षिके विद्यार्थ्यांना करून दाखविण्यात आली. विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. याप्रसंगी शिक्षिका सौ. अनिता गायगोळे, सौ. श्रुती कांबळे आणि श्री. हर्षद मोघे उपस्थित होते.

### अभिनंदनीय

दि. २२ मार्च २०२५ रोजी पुणे येथील १० किमी मॅरेथॉन स्पर्धेत इ. ९ वी ब मधील एन. सी. सी. एअर विंग कॅडेट कु. राजवीर जाधवराव याने सहभाग घेतला होता. त्याने १० किमी चे अंतर केवळ ५४ मिनिटांत पूर्ण केले. त्याबद्दल कु. राजवीर जाधवराव याचा पदक देऊन गौरव करण्यात आला.

***

**आपला पत्ता बदललेला आहे का?**

**समाचार संदर्भातील आपला बदललेला पत्ता त्वरीत कळवावा ही विनंती.**
**पत्ता कळविताना जुना व नवा दोन्ही पिन कोड तसेच आपला ईमेल आयडी सुध्दा कळवावा म्हणजे आपणास ई-समाचार पाठविणे सोईचे होईल.**

pvgsamachar@gmail.com
**या ईमेल आयडी वर कळवावे.**

**संपादक**

## * मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे ९ *



दि. १ फेब्रुवारी २०२५ रोजी इ. १० वीचा निरोप समारंभ आयोजित कार्यक्रम प्रसंगी 'स्वच्छ वर्ग' स्पर्धेच्या विजेतेपदाचा चषक प्राचार्या सौ. सुप्रिया देशकुलकर्णी, पर्यवेक्षिका सौ. जयती नरवणे यांच्या हस्ते स्वीकारताना इ. १०वी क चे विद्यार्थी



दि. ७ फेब्रुवारी २०२५ रोजी 'संस्कृतपीठम' च्या उद्‌घाटन प्रसंगी
डॉ. सौ. कल्याणी नामजोशी, अध्यात्मिक गुरू आणि तत्त्ववेत्या यांचे स्वागत करताना
उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, समवेत डावीकडून संचालक श्री. आनंद कुलकर्णी, कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी
आणि प्राचार्या सौ. सुप्रिया देशकुलकर्णी



२०२४-२५ यावर्षीचा 'स्वच्छ वर्ग' स्पर्धेच्या विजेतेपदाचा चषक स्वीकारणाऱ्या
अनुक्रमे इ. ७वी ड , इ. ८वी अ, इ. ९ वी ड च्या विद्यार्थ्यांसमवेत प्राचार्या, पर्यवेक्षिका आणि शिक्षिका

# कॉलेज ऑफ इंजिनिअरींग व टेक्नॉलॉजी आणि जी.के.पाटे (वाणी) व्यवस्थापन महाविद्यालय, पुणे

**संचालक : श्री. सुनील रेडेकर**

**संचालक : प्रा. राजेंद्र गो. कडुसकर**

**प्र. प्राचार्य : डॉ. मनोज तारांबळे**

## इ ॲण्ड टी सी इंजिनिअरिंग विभाग

महाविद्यालयास विद्यापीठ अनुदान आयोगाने (UGC) शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून 'स्वायत्त दर्जा' प्रदान केला आहे. भागधारक, उद्योगजगतातील तज्ज्ञ आणि विद्यार्थ्यांच्या सतत बदलत्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी संस्थेचे नेतृत्व दूरदृष्टी असलेल्या नेत्यांकडे आणि विषयतज्ज्ञांकडे असावे, यासाठी सखोल विचारविनिमयानंतर इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकम्युनिकेशन अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. या मंडळाची पहिली औपचारिक बैठक दि. १५ मार्च २०२५ रोजी सकाळी ११ वाजता कॉलेजमधील स्मार्ट क्लासरूममध्ये पार पडली. या बैठकीत NEP २०२० च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार क्रेडिट स्ट्रक्चर, इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकम्युनिकेशन शाखेशी संबंधित प्रथम वर्षाच्या अभ्यासक्रमाची रचना, तसेच द्वितीय वर्ष, तृतीय वर्ष आणि बी.टेक अभ्यासक्रमाच्या चौकटीवर सविस्तर चर्चा करण्यात आली आणि त्याला मान्यता देण्यात आली.

डिझाईनटेक सिस्टम प्रायव्हेट लिमिटेड आणि मॅथवर्क्स यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ३ एप्रिल ते ५ एप्रिल २०२५ दरम्यान 'Application Design using MATLAB' या विषयावर तिसऱ्या वर्षाच्या अभियांत्रिकी विभाग १ च्या विद्यार्थ्यांसाठी विशेष विकास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच दि. ९ एप्रिल २०२५ रोजी नॉर्दर्न ट्रस्ट कॉर्पोरेशनचे श्री. बालाजी लोंढे यांच्या मार्गदर्शनाखाली ''प्रगत जावा प्रोग्रामिंग'' या विषयावर उद्योगतज्ज्ञ अतिथी सत्राचे आयोजन करण्यात आले. या सत्राचे नियोजन प्रो. एन. डी. चौधरी यांनी केले होते.

दि. ७ एप्रिल ते ९ एप्रिल २०२५ दरम्यान दरवर्षीप्रमाणे ''ॲल्युमनी टॉक सिरीज'' यशस्वीपणे आयोजित करण्यात आली. गेल्या पाच वर्षांपासून ही परंपरा विभागाकडून यशस्वीरित्या राबवली जात आहे. या कार्यक्रमात नामवंत माजी विद्यार्थी सहभागी झाले होते. कु. साक्षी रानमोडे यांनी ''First Corporate Leap'' या विषयावर नवोदित विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त मार्गदर्शन केले. श्री. श्लोक बागमार आणि श्री. नचिकेत लौल यांनी 'परदेशातील उच्च शिक्षणाचा अनुभव' याविषयी माहिती सांगितली. श्री. भूषण मुथियायन यांनी 'आपल्या उद्योजकीय प्रवासाची प्रेरणादायी कथा' सांगत व्यावहारिक सल्ले दिले. या सत्रांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, विद्यार्थ्यांना त्यातून मौल्यवान शिकवण मिळाली. ही मालिका सध्याचे विद्यार्थी आणि माजी विद्यार्थ्यांमधील नातेसंबंध अधिक दृढ करणारी ठरली.

औद्योगिक प्रकल्पास शैक्षणिक भेट नुकतीच आयोजित करण्यात आली. या भेटीमध्ये तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनीही सक्रिय सहभाग घेतला. उल्लेखनीय बाब म्हणजे हा प्रकल्प विभागातील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी कु. वैभव काळे, कु. वेदांत भगत, कु. शिवकन्या आणि कु. अस्मिता यांनी विकसित केला आहे. हा प्रकल्प अभ्यासक्रमातील 'एम्बेडेड सिस्टिम डिझाईन' या विषयाशी सुसंगत असून, त्यात तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आलेला आहे. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रकल्पाची रचना, कार्यप्रणाली आणि तांत्रिक बाबींचे महत्त्वपूर्ण ज्ञान मिळाले. ही भेट सर्व विद्यार्थ्यांसाठी एक समृद्ध व प्रेरणादायी अनुभव देणारी ठरली.

द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी दि. १६ एप्रिल २०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता कक्ष क्रमांक १०७ मध्ये तज्ज्ञ सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या सत्रासाठी पुण्यातील पीआयसीटी महाविद्यालयाच्या डॉ. मंजिता काळे या तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून उपस्थित

होत्या. त्यांना नियंत्रण प्रणाली (कंट्रोल सिस्टिम्स) या क्षेत्रात २१ वर्षांहून अधिक व्यापक अनुभव आहे. सत्रात त्यांनी नियंत्रण प्रणालीतील मूलभूत आणि महत्त्वाच्या संकल्पनांचे सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच 'स्टेट स्पेस व्हेरिएबल्स'वर विशेष भर दिला. या ज्ञानवर्धक सत्राचा लाभ सुमारे १३० विद्यार्थ्यांनी घेतला. हे सत्र विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त व प्रेरणादायी ठरले.

महाविद्यालयात संस्थेच्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) युनिटतर्फे दि. ३ एप्रिल २०२५ रोजी रक्तदान शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात एकूण १०८ बाटल्या रक्त संकलित करण्यात आले. रक्तदान मोहिमेसोबत दंत तपासणी शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते. संपूर्ण कार्यक्रम अत्यंत सुनियोजित आणि प्रशंसनीय पद्धतीने पार पडला. सहभागी विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी याला उत्तम प्रतिसाद दिला. समाजाच्या आरोग्यवर्धनासाठी युनिटने केलेला हा उपक्रम उल्लेखनीय ठरला, आणि त्याला उत्स्फूर्त सहभाग व भरघोस पाठिंबा मिळाला.

विभागातील कर्मचारी, प्रयोगशाळा सहाय्यक आणि शिपाई यांनी विद्यार्थ्यांसाठी एक उत्कृष्ट उपक्रम राबवला, ज्यामध्ये त्यांचा सामाजिक दायित्वाचा ठोस प्रत्यय आला. या उपक्रमाअंतर्गत, सदाशिव पेठेच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी ''Public Address Amplifiers Sysyetm'' देणगी म्हणून प्रदान करण्यात आली. या उपकरणामुळे संस्थेतील विविध कार्ये, सूचना आणि कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबवता येतील. हा उपक्रम सामाजिक जाणीव आणि समाजकल्याणासाठी योगदान देण्याच्या वृत्तीचा एक उत्तम उदाहरण ठरले आहे.

विभागातील विद्यार्थ्यांना JSPM तर्फे आयोजित प्रकल्प स्पर्धेत रु. १०,०००/- चे बक्षिस मिळविले.

प्रकल्पाचे नाव Fire Quell : फायर फाइटिंग रोबोट PBL. शिक्षक आणि सर्व टीमला हार्दिक शुभेच्छा आणि अभिनंदन!

द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांच्या माझा हौशी प्रकल्प ''Smart Home for Everyone'' ने 'भीमफेस्ट २०२५' दरम्यान समाज कल्याण विभागाच्या प्रकल्प स्पर्धेत द्वितीय पुरस्कार मिळवला. या स्पर्धेत २८ संघ सहभागी झाले असून महाविद्यालयाने रु. ५,०००/- रोख पारितोषिक प्राप्त केले.

दि. ११ एप्रिल २०२५ रोजी तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी ''विद्युत उपकरण सर्किट्स आणि त्यांचे औद्योगिक उपयोजन'' या विषयावरील सत्राचे आयोजन करण्यात आले होते. हे सत्र विद्युत, इलेक्ट्रॉनिक्स आणि एम्बेडेड प्रणाली या क्षेत्रातील तज्ज्ञ, तांत्रिक सल्लागार आणि फ्रीलान्सर श्री. चारुदत्त भुरे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाले.

## इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी इंजिनिअरिंग विभाग

पुण्यातील पीआयसीटी महाविद्यालयामध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावरील तांत्रिक कार्यक्रम ''कन्सेप्ट्स - ओपन सॉफ्टवेअर येथे इम्पेटस अँड कन्सेप्ट्स २०२५'' आयोजित केले होते. यामध्ये अंतिम वर्षातील ४ विद्यार्थ्यांच्या गटाने दुसरे स्थान पटकावले.

प्रकल्पाचे नाव MRI to CT Synthesis Using Deep Learning सहभागी विद्यार्थी कु. साक्षी पोटी, कु. श्रुती पत्की, कु. साहिल थिटे, कु. रजत राज शर्मा. या विद्यार्थ्यांना प्रो. मीनल अपसंगी यांनी मार्गदर्शन केले.

संगणक अभियांत्रिकी विद्यार्थ्यांच्या असोसिएशन द्वारे आयोजित महाविद्यालयातील संगणक विभागात झालेल्या ''इनोव्हर्स हॅक फेस्ट -२४ तास हॅकथॉन'' स्पर्धेत आयटीच्या कु. आदित्य निकम व त्याच्या संघाला रु. ११,०००/- चा दुसरा उपविजेता पुरस्कार प्राप्त झाला.

पुणे येथील SKNCOE द्वारे आयोजित ११ व्या राष्ट्रीय स्तरावरील प्रकल्प स्पर्धेत ''एम्बेडेड सिस्टीम्स आणि IOT'' या क्षेत्रात अंतिम वर्षाच्या कु. राजस नांदगांवकर, कु. क्षमिता माने, कु. अथर्व अंधारे, कु. उत्कर्ष अगरवाल या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांकाचे

पारितोषिक जिंकले. या विद्यार्थ्यांना प्रो. शुभांगी देशपांडे यांनी मार्गदर्शन केले.

दि. ११, १२ आणि १३ एप्रिल २०२५ रोजी विभागाने पहिल्यांदाच मान्यता प्रक्रिया पूर्ण केली आहे. तज्ज्ञांमध्ये बीएमएस अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. इंद्राम्मा एम. - एचओडी-एआय अँड डीएस आणि जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, दिल्ली येथील निवृत्त प्राध्यापक प्रा. डॉ. बालसुंदरन यांनी माहिती तंत्रज्ञान कार्यक्रमाचे मूल्यांकन केले.

दि. १५ मार्च २०२५ रोजी सर्व बोर्ड सदस्यांसह द्वितीय वर्ष, तृतीय वर्ष आणि बी.टेक. माहिती तंत्रज्ञानाच्या स्वायत्त अभ्यासक्रमाच्या पहिल्या मसुद्याला अंतिम रूप देण्यासाठी पहिली ऑनलाइन बैठक आयोजित करण्यात आली होती.

## मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभाग

### अभिनंदनीय

वरिष्ठ प्राध्यापिका डॉ. शुभांगी गोंडाणे यांना 'वूमन सबस्टन्स' या संस्थेकडून 'वूमन इन टेक्नॉलॉजी अँड इनोव्हेशन' या अवॉर्ड ने दि. ८ मार्च २०२५ रोजी महिला दिनाच्या निमित्ताने सन्मानित करण्यात आले. डॉ. शुभांगी गोंडाणे यांचा संशोधन पेपर 'अकॅडमिक रिसर्च इन सायन्स टेक्नॉलॉजी अँड इंजिनियरिंग, बर्लिन जर्मनी' या इंटरनॅशनल कॉन्फरन्स मध्ये निवडण्यात आला. डॉ. शुभांगी गोंडाणे यांचे महाविद्यालयातर्फे हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !

पी. ई. एस. सोसायटीच्या मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालयातील विभागप्रमुख डॉ. समीर भोसले, यांनी दि. ४ एप्रिल २०२५ रोजी एन. बी. ए. कमिटी तसेच पी फाईल संदर्भात मार्गदर्शन केले.

दि. ३१ मार्च २०२५ रोजी डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे वरिष्ठ प्राध्यापक डॉ. विनय कुलकर्णी यांनी यांत्रिकी विभागातील शिक्षकांना 'आउटकम बेस एज्युकेशन' वर व्याख्यान दिले. यामध्ये त्यांनी 'कोर्स आउटकम आणि प्रोग्राम आउटकम' यावर भर दिला.

दि. ११ आणि १२ एप्रिल २०२५ रोजी एन. बी. ए. कमिटीची भेट आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी त्यांनी सर्व प्रयोगशाळांना भेट दिली. तसेच ७ क्रायटेरियांच्या फाईल ची तपासणी केली. याप्रसंगी डॉ. प्रवीण कुलकर्णी व विभागप्रमुख डॉ. एम. एम. भूमकर यांनी मार्गदर्शन केले.

अंतिम वर्षाच्या कु. श्रीयश जोशी, कु. अथर्व टिकोरे, कु. साहिल खंडागळे व कु. अथर्व भोटे या विद्यार्थ्यांनी सिंबायोसिस इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, पुणे यांनी आयोजित केलेल्या देश पातळीच्या प्रोजेक्ट स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळवले. त्याबद्दल विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणारे प्राध्यापक श्री. आर. एम. पानगे यांचे हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !

## कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभाग

ACES टीमने दि. २२ आणि २३ मार्च २०२५ रोजी २४ तास चालणाऱ्या 'इनोव्हर्स हॅकफेस्ट २०२५' चे यशस्वी आयोजन केले. या कार्यक्रमात महाराष्ट्रातील ५१ संघांचा प्रभावी सहभाग होता. पहिल्या दिवशी, प्राथमिक फेरीतील समस्या विषयांवर चर्चा करून ८ मार्गदर्शकांनी संघांना मार्गदर्शन केले. दुसऱ्या दिवशी ८ न्यायाधीशांनी अंतिम फेरीतील संघांचे मूल्यांकन केले. हा कार्यक्रम सर्जनशीलता, नावीन्य आणि उत्साहाचे एक रोमांचक प्रदर्शन होता. आम्ही प्रायोजकांचे - एलिट, पिक्टेलएआय, डीएओएसट्रीट, इनोप्लेक्सस, स्टार कॉपियर्स आणि स्मार्ट कुकी - यांनी दिलेल्या उदार पाठिंब्याबद्दल मनापासून आभार मानतो.

या कार्यक्रमातील हॅकेथॉनमधील रु. ११,०००/- चे तिसरे बक्षीस जिंकलेला संघ - क्रेझी ८. कु. आदित्य निकम, कु. वेदांत बनैटकर

विभागाने गेमिंगसाठी AR/VR वर ३ दिवसांचा बूटकॅम्प आयोजित केला. डॉ. वैभव खटावकर हे रिसोर्स पर्सन होते आणि त्यांनी विद्यार्थ्यांना संबंधित तंत्रज्ञानावर फलदायी प्रत्यक्ष सत्रे दिली. विद्यार्थ्यांनी युनिटी आणि इतर साधनांमध्ये लघुचित्रे पूर्ण केली. ही

संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल डॉ. वैभव खटावकर यांचे आभार.

झेनजी, मूव्हमेंट फॉर जॉयस लिव्हिंगच्या संस्थापक श्रीमती योगिनी गांधी यांनी ऑडिट कोर्सचा भाग म्हणून एसई विद्यार्थ्यांसाठी २ दिवसांचे सत्र आयोजित केले होते.

तृतीय वर्षातील कु. मुस्तानसिर रंगवाला, कु. रोहन माळी, कु. अनुराग मुळे आणि कु. आर्या लिंगायत यांच्या टीमने त्यांच्या पीबीएल प्रकल्प ''सुरक्षित आणि खाजगी व्यवहारांसाठी ब्लॉकचेन पॉवर्ड पेमेंट्स ॲप्लिकेशन'' साठी इन्व्हेंटेकमध्ये तिसरे स्थान पटकावले.

## इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभाग

दि. १२ एप्रिल २०२५ रोजी तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय 'इलेक्ट्रिकल वायरिंग डिझाईन यूझिंग ऑटोकॅड अँड प्रॅक्टिकल फिटिंग' या विषयावर 'हॅन्ड्स ऑन ट्रेनिंग प्रोग्रॅम' घेण्यात आला. प्रा विशाल ताठे यांनी हे प्रशिक्षण घेतले.

शनिवार दि. १२ एप्रिल २०२५ रोजी द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांचे 'प्रोजेक्ट बेस्ड लर्निंग' या विषयाचे मूल्यमापन घेण्यात आले. विभागातील माजी विद्यार्थी कु. प्रथमेश पटवर्धन, कु. रसिक आढाव, कु. पुंडलिक महाले आणि कु. चेतन पाटील यांनी यासाठी मोलाचे सहकार्य केले. प्रा. सुरेश यमला यांनी सर्व कार्यक्रमाचे आयोजन केले.

दि. १६ एप्रिल २०२५ रोजी EESA तर्फे Electrabuzz या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यात विविध टेक्निकल व नॉन टेक्निकल स्पर्धा घेण्यात आल्या. कार्यक्रमाचे उद्घाटन संचालक श्री. सुनील रेडेकर व प्रा. राजेंद्र कडुसकर आणि प्र. प्राचार्य डॉ. मनोज तारांबळे यांनी केले. EESA स्टाफ इनचार्ज प्रा. सुरेश यमला आणि विभागप्रमुख डॉ. मंगेश ठाकरे यांनी मार्गदर्शन केले.

दि. १७ एप्रिल २०२५ रोजी अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ विभागातर्फे आयोजित करण्यात आला होता. त्यात विभागातील सर्व विद्यार्थी व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे भाग घेतला. विद्यार्थ्यांचे मनोगत, करमणूक कार्यक्रम, बक्षीस समारंभ आणि शाही मेजवानी असे कार्यक्रमाचे स्वरूप होते.

दि. १३ एप्रिल २०२५ रोजी सिंबॉयसिस महाविद्यालयाने आयोजित केलेल्या राष्ट्रीय प्रोजेक्ट स्पर्धेमध्ये अंतिम वर्षाच्या कु. धनाजी रामतीर्थे आणि कु. करण पाटील या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या ''Solar Powered Multipurpose Farming Equipment'' या प्रोजेक्टला तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. हा आंतरशाखा प्रोजेक्ट विद्युत आणि यंत्र अभियांत्रिकी विभागातर्फे सादर करण्यात आला. या विद्यार्थ्यांना डॉ. मंगेश एस. ठाकरे यांचे मार्गदर्शन लाभले.

दि. २० एप्रिल रोजी २०२५ PES MCOE या महाविद्यालयाने आयोजित केलेल्या राष्ट्रीय प्रोजेक्ट स्पर्धेमध्ये अंतिम वर्षाचे विद्यार्थी कु. आशिष पाटील, कु. फरदीन पठाण, कु. लक्ष्मण जाधव आणि कु. अमित केदार या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या ''Energy Harvesting Backpack using Novel Trans - Rotary Magnetic Gear'' या प्रोजेक्टला दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. हा आंतरशाखा प्रोजेक्ट विद्युत आणि यंत्र अभियांत्रिकी विभागातर्फे आहे. या विद्यार्थ्यांना डॉ. मंदार पी. भवाळकर यांचे मार्गदर्शन लाभले.

## आर्टिफिशियल इंटेलिजन्स अ‍ॅण्ड डेटा सायन्स विभाग

तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी प्रोजेक्ट ओरिएंटेशन सत्राचे आयोजन प्रा. स्वप्ना शिंगाडे यांनी केले. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी Ethovise Tech Consultancy द्वारे डेटा सायन्स, सायबर सिक्युरिटी आणि एएनएन या अतिथी सत्रांचे आयोजन करण्यात

आले होते. सत्रांचे समन्वय प्रा. मृणाल बुचडे, प्रा. मधुरा परांजपे यांनी केले.

विभागप्रमुख डॉ. मीनाक्षी अत्रे त्यांचे संशोधन पेपर सादर करण्यासाठी फ्रान्समध्ये होणाऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेला उपस्थित होत्या. त्यांनी ''ब्लूमीफाय'' हा पेपर आंतरराष्ट्रीय परिषदेत (ICCARO २०२५) सादर केला. ही परिषद दि. १४ ते १६ एप्रिल २०२५ दरम्यान पॅरिस, फ्रान्स इथे आयोजित होती. यामध्ये कु. सार्थक करंदीकर, कु. अभिजित सूर्यवंशी, कु. कबीर मर्चंट, कु. हेरंब पाटील हे विद्यार्थी सहभागी झाले होते.

द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या Project Based Learning II चा अंतिम आढावा प्रा. शुभांगी ए. सोळंके यांनी घेतला. तसेच त्यांनी Project Based Learning II ३ गटांचे कॉपीराइट Documents दाखल केले आहेत.

द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी Python आणि Java Spoken Tutorial Test दि. १७ एप्रिल २०२५ रोजी घेण्यात आली. हा उपक्रम प्रा. पल्लवी बंगाले यांनी समन्वयित केला. विभागातील प्रा. शुभांगी ए. सोलंके (वैष्णवी सनम आणि साहिल पाटील एआय अँड डीएस, हेरंब पाटील, समीक्षा बोडुवार आणि प्रा. डॉ. पी. जी. शेटे ई अँड टीसी) यांच्या प्रकल्प गटाने थायलंडमधील सियाम टेक्नॉलॉजी कॉलेज आणि ISRHE येथे कॉन्फरन्स वर्ल्ड आणि IARDO च्या सहकार्याने एक पुनरावलोकन पेपर प्रकाशित केला. तसेच या गटाचा IEEE ICASI २०२५ मध्ये जर्नल पेपर स्वीकारला आहे.

अंतिम वर्षाची विद्यार्थिनी कु. प्रतिक्षा वानावे हिची जपानमधील Mynavi Corporation मध्ये निवड झाली.

प्रा. पल्लवी बंगाले यांनी द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी ''डेटा स्ट्रक्चर अँड अल्गोरिदमवरील औद्योगिक अंतर्दृष्टी'' या विषयावर अतिथी सत्र आयोजित केले.

प्रा. विजयालक्ष्मी कानडे यांनी तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी इंटर्नशिप पुनरावलोकन आयोजित केले.

## प्रिंटिंग अँण्ड पॅकेजिंग टेक्नॉलॉजी इंजिनिअरिंग विभाग

### नॅशनल कॉन्फरन्स ऑन फूड पॅकेजिंग - २.०

विभागाने जागतिक पॅकेजिंग दिनानिमित्त दि. २४ मार्च २०२५ रोजी फूड पॅकेजिंग २.० या राष्ट्रीय परिषदेचे यशस्वी आयोजन केले. सन २०२४ पासून आपण या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन दरवर्षी करीत आहोत. मागील वर्षी छोट्या प्रमाणावर सुरू केलेल्या या उपक्रमास या वर्षी उत्तम प्रतिसाद मिळाला. या उपक्रमात विद्यार्थ्यांना, संशोधकांना आणि उद्योग तज्ज्ञांना एकत्र आणून फूड पॅकेजिंग क्षेत्रामधील नवनवीन कल्पनांचा आढावा घेण्यात येतो. देशभरातून व राज्यातून विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग या परिषदेसाठी लाभला. मुंबई, पुणे व नाशिकहून पदवी व पदविका अभ्यासक्रमातील सुमारे २०० हून अधिक विद्यार्थ्यांनी या परिषदेचा लाभ घेतला.

या कार्यक्रमात आर्टिफिशियल इंटेलिजन्सवर आधारित सप्लाय चेन्स, सस्टेनेबल पॅकेजिंग मटेरिअल, स्मार्ट पॅकेजिंग, बायोडिग्रेडेबल पेपर बेस्ड पर्याय यावर माहितीपूर्ण सत्रे पार पडली.

फुजिफिल्म सेरिकोल, चितळे बंधू या आणि अन्य अग्रगण्य उद्योगातील उद्योग तज्ज्ञांनी आपले ज्ञान व अनुभव सांगून पॅकेजिंग उद्योगातील नव्या पिढीला प्रेरणा दिली. या प्रसंगी प्रमुख पाहुणे श्री. अतिथी मुजुमदार व सन्माननीय अतिथी श्री. इंद्रनील चितळे हे होते. श्री. अतिथी मुजुमदार यांनी 'फुजिफिल्म सेरेकॉल' या कंपनीतर्फे पॅकेजिंग साठी बनविण्यात येणाऱ्या खास उत्पादनांबद्दल तांत्रिक माहिती सादर केली. श्री. इंद्रनील चितळे यांनी चितळे बंधू या व्यवसायाचा सुरूवातीपासूनचा प्रवास विद्यार्थ्यांसमोर उलगडला व विद्यार्थ्यांच्या यशस्वी व्यावसायिक कारकिर्दीसाठी मार्गदर्शन केले. डॉ. शिल्पा आंचवले (सस्टेनेबल ट्रेन्ड्स इन इंक्स अॅण्ड पॅकेजिंग) प्रो. एन. सी. सहा (मॉडर्न

पॅकेजिंग टेक्नॉलॉजीज टू एनहान्स शेल्फ लाईफ ऑफ फ्रेश अ‍ॅण्ड प्रोसेस्ड फूड प्रॉडक्ट्स), श्री. आशुतोष कुमार (एआय ड्रिव्हन सप्लाय चेन ऑप्टिमायझेशन फॉर फूड पॅकेजिंग), श्री. श्रेयस सिकची (फ्रॉम ट्रॅडिशन टू इनोव्हेशन : द मंगलम ऑईल मिल्स जर्नी इन सस्टेनेबल फूड पॅकेजिंग), डॉ. अभिजित भट्टाचार्य (ड्रायव्हिंग सस्टेनॅबिलिटी विथ पेपर बेस्ड मटेरिअल्स फॉर फूड पॅकेजिंग), डॉ. शर्मिला पांडे (रेझिलन्स, पॅशन अ‍ॅण्ड पॉवर ऑफ रिइनव्हेन्शन) व डॉ. बिजेंदर कौशिक (टॉप २० ट्रेन्ड्स इन फूड पॅकेजिंग) या वक्त्यांनी देखील विविध विषयांवर आपले विचार प्रगट केले.

प्रा. पद्मजा जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रामुख्याने द्वितीय वर्ष मुद्रण अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडला. सर्व मान्यवर वक्ते, सहभागी पाहुणे व विद्यार्थी यांचे मनःपूर्वक आभार. पुढील वर्षीदेखील हा उपक्रम राबविण्याचा मानस या निमित्ताने संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर यांनी व्यक्त केला. राष्ट्रगीताने परिषदेची सांगता झाली. सर्व उपस्थित विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रकाचे वाटप करण्यात आले.

## प्रथम वर्ष अभियांत्रिकी

CCC (को-करिकुलर कोर्स)-२ नुसार, बेसिक ऑफ फायर सेफ्टी अंतर्गत, विद्यार्थी आणि प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभागाच्या २-३ कर्मचाऱ्यांनी Tolani मेरीटाईम इन्स्टिट्यूट, पुणे येथे भेट दिली. विद्यार्थ्यांना विद्युत सुरक्षा, यांत्रिक सुरक्षा, अग्निसुरक्षा सत्रामध्ये प्रथमोपचाराबद्दल माहिती मिळाली.

दि. ११ ते १३ एप्रिल २०२५ रोजी नियोजित NBA बैठकीची तयारी म्हणून, सर्व प्रथम वर्ष विद्याशाखांनी Criterion ८ वर काम केले. त्या उद्देशासाठी ए. आर. एफ. फाईलचे परिणाम मूल्यांकन, अंतर शोधण्यासाठी डेटा संकलन आणि अंतर पूर्ण करण्यासाठी केलेल्या उपाय योजनांसारख्या विविध मापदंडांवर बैठका घेण्यात आल्या.

## एसडबल्यूएस

### विद्यार्थी कल्याण योजनेअंतर्गत ''मुली सक्षमीकरण कक्ष आणि निर्भय कन्या अभियान''

कन्या सक्षमीकरण कक्ष आणि निर्भय कन्या अभियान यांनी विद्यार्थी कल्याण योजना, विद्यार्थी विकास मंडळ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत महिला विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांमध्ये जागरूकता, आत्मविश्वास वाढवण्याच्या उद्देशाने सक्षमीकरण सत्राची मालिका आयोजित केली. विषय तज्ज्ञांच्या सहभागाने आणि विद्यार्थी आणि प्राध्यापकांच्या सक्रिय सहभागाने खालील सत्रांचे आयोजन करण्यात आले होते.

दि. १८ फेब्रुवारी २०२५ प्रा. प्रज्ञा कुलकर्णी यांच्याकडून जीवनातील अज्ञात गोष्टींकडे वळणे अशी उद्दिष्टे साध्य झाली. ✻ अनिश्चिततेकडे सकारात्मक मानसिकता विकसित करणे. ✻ आत्म-जागरूकता आणि आंतरिक आत्मविश्वास जोपासणे. ✻ वैयक्तिक आत्मविश्वास वाढीसाठी एक आधार प्रणाली तयार करणे. या कार्यक्रमात ४४ मुली आणि १० कर्मचारी उपस्थित होते.

दि. २४ फेब्रुवारी २०२५, महिला सक्षमीकरण - पल्लवी मेढेकर यांच्याकडून स्व-संरक्षण सत्रखालील उद्दिष्टे साध्य झाली. ✻ जागरूकता निर्माण करणे आणि प्रतिबंध करणे ✻ मूलभूत स्व-संरक्षण तंत्रे शिकणे ✻ आत्मविश्वास निर्माण करणे. या कार्यक्रमात ४४ मुली आणि १० कर्मचारी उपस्थित होते.

दि. २८ फेब्रुवारी २०२५, रेशा अभ्यंकर यांच्याकडून स्वॉट विश्लेषण सत्रखालील उद्दिष्टे साध्य झाली. ✻ आत्म-जागरूकता वाढविण्यासाठी. ✻ आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी ✻ संधी ओळखण्यासाठी ✻ आव्हानांना तोंड देण्यासाठी. या कार्यक्रमात ४२ मुली आणि ०४ कर्मचारी उपस्थित होते. या सत्रांना सकारात्मक प्रतिसाद मिळाला, ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये जीवन कौशल्ये, सुरक्षितता

जागरूकता आणि वैयक्तिक विकास धोरणे विकसित करण्याची वाढती आवड आणि उत्साह दिसून आला. विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रो. ए. जी. डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली मुलींच्या सक्षमीकरण कक्षाच्या समन्वयक प्रा. श्रीमती एम. आर. अपसंगी यांनी या सत्रांचे आयोजन आणि संचालन केले.

विद्यार्थी विकास मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी सहाय्यक समिती आणि महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मार्च महिन्यात एकदिवसीय व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी प्रख्यात व्यक्तिमत्त्व विकास प्रशिक्षक श्री. प्रफुल्ल कराळे यांनी संबंधित विषयावर मार्गदर्शन केले. वरील कार्यक्रमाचे आयोजन प्रा. डॉ. एन जी जयस्वाल व प्रा. आदित्य कुमार डोंगरे यांनी केले.

## ट्रेनिंग अ‍ॅण्ड प्लेसमेंट विभाग

प्लेसमेंट विभागामध्ये मागील महिन्यात प्रतिष्ठित कंपन्यांनी अंतिम वर्षाच्या मुलांना खालील प्रमाणे नोकरीच्या संधी दिल्या. त्यामध्ये प्रामुख्याने पुढील कंपन्यांचा सहभाग होता. हॅशडइन डेलॉईट, डेटालॉग्स, केएसबी, एलटीआय इंडस्ट्री, मॅर्गेज कार्ट, ट्यूडिप टेक्नॉलॉजी, फ्लीटगार्ड. तसेच कॉग्निजंट, टीसीएस, एचसीएल टेक्नॉलॉजी या कंपन्यांचे निकाल पुढील काही दिवसांमध्ये अपेक्षित आहेत.

दि. ४ एप्रिल २०२५ रोजी श्री. नितीन लाठे यांच्या मार्गदर्शनाखाली परदेशातील शिक्षणासंबंधी मार्गदर्शन आणि जीआरइ मॉक टेस्ट आयोजित करण्यात आली होती. तसेच विविध कंपन्यांच्या, उदाहरणार्थ - Cognizant, Deloitte, Wipro Pari, Tech Mahindra, TCS व Datalogz यांच्या पूर्व तयारीसाठी प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्यात आली होती.

TIME या नामांकित संस्थेतर्फे CAT या स्पर्धात्मक परीक्षेसाठी मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले. Etraveli या कंपनीतर्फे ‘करियर गायडन्स ऑन टेक्निकल अस्पेक्ट्स इन कॉर्पोरेट’ आणि ‘करियर गायडन्स ऑन प्रोफेशनलिझम इन कॉर्पोरेट’ या विषयांवरती मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजित करण्यात आली होती.

कृषी तंत्रज्ञान क्षेत्रातील नामांकित कंपनी सिंजेंटा तर्फे कृषी क्षेत्रामध्ये उपलब्ध असलेल्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील संधी या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

श्री. अविनाश पोरे, प्रा. डॉ. पायल तायडे, प्रा. डॉ. एन. जी. जयस्वाल यांनी वरील कार्यक्रमांचे आयोजन केले.

## एमबीए विभाग

दि. २९ मार्च २०२५ रोजी पूना ब्लाइंड होम आणि स्कूल फॉर गर्ल्स येथे भेट दिली. शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती रांका या आहेत. सध्या शाळेत १२० हून अधिक मुली आहेत. या भेटीतून विद्यार्थ्यांनी शिस्तीचे महत्त्व, सतत शिकण्याची इच्छा, जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्याचे बळ, आणि अपयशाचा सामना केला पाहिजे ही धारणा, सर्व व्यक्तींचा आदर करण्याचे मूल्य, परिस्थितीकडे दुर्लक्ष करून आनंद टिकवून ठेवण्याची आवश्यकता, आयुष्यात त्यांचे लक्ष्य साध्य करण्यासाठी प्रत्येकाने जोरदार इच्छाशक्ती बाळगली पाहिजे असा विश्वास अशा अनेक महत्त्वपूर्ण अंतर्दृष्टी मिळविली.

दि. १५ एप्रिल २०२५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती साजरी करण्यात आली. एमबीएच्या विद्यार्थ्यांनी आयोजित केलेल्या या कार्यक्रमाचे उद्दिष्ट डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक न्याय, समानता आणि भारतीय संविधानाच्या विकासात दिलेल्या महत्त्वपूर्ण योगदानाचा उत्सव साजरा करणे आणि त्याबद्दल जागरूकता वाढवणे होते. या कार्यक्रमाचा उद्देश उपस्थितांना समावेशक आणि लोकशाही समाज निर्माण करण्यासाठी स्वातंत्र्य, समानता आणि बंधुत्वाच्या त्यांच्या आदर्शांचे

समर्थन करण्यास प्रेरित करणे हा होता. सर्वांसाठी न्याय्य आणि निःपक्ष समाज निर्माण करण्यासाठी आपले जीवन समर्पित करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामर्थ्य आणि धैर्य विद्यार्थ्यांना समजले.

एनडीएलआय क्लब ॲक्टिव्हिटी अंतर्गत दि. १५ एप्रिल २०२५ रोजी विभागाने विद्यार्थ्यांना समाजासमोरील विविध समस्यांबद्दल जागरूकता समजून घेण्यासाठी सामाजिक विषयांवर निबंध लेखन स्पर्धा आयोजित केली होती. एनडीएलआय क्लब ॲक्टिव्हिटी अंतर्गत विभागाने सामाजिक विषयांवर निबंध लेखन स्पर्धा आयोजित केली होती, ज्याचा उद्देश तरुण पिढीला भेडसावणाऱ्या सामाजिक समस्यांबद्दल विद्यार्थ्यांचे विचार आणि मते समजून घेणे आणि त्यांचे निराकरण करणे हा होता. या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांना एनडीएलआय पोर्टलवर नोंदणी करण्यास आणि हा उपक्रम कुठे प्रकाशित झाला आहे ते तपासण्यास सांगण्यात आले. एनडीएलआय क्लब्सच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्यासमोरील समस्या आणि या व्यासपीठाद्वारे प्रभावीपणे पसरवता येणारी जागरूकता जाणून घेता आली.

## स्पोर्ट्‌स विभाग

महाविद्यालयातील महिला बॅडमिंटन संघाची कर्णधार कु. श्रुती कुंभार, (अंतिम वर्ष ई. ॲण्ड टी. सी.), कु. अन्वी कोरे, (तृतीय वर्ष ए. आय. डी. एस.) कु. गार्गी कुलकर्णी (द्वितीय वर्ष मेकॅनिकल) यांनी सोमवार, दि. ३ मार्च २०२५ रोजी आर्मी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी आयोजित राज्यस्तरीय ''PACE २०२५'' या क्रीडास्पर्धेमध्ये सहभागी होऊन, सांघिक प्रकारात प्रथम क्रमांक पटकविला.

तसेच कु. सिद्धेय मसुरकर (तृतीय वर्ष इ ॲण्ड टीसी) आणि कु. अन्वी कोरे (तृतीय वर्ष आर्टिफिशयल इंटेलिजन्स ॲण्ड डेटा सायन्स) यांनी मिश्र दुहेरी प्रकारात द्वितीय क्रमांक पटकविला. कु. अन्वी कोरे हिने वैयक्तिक प्रकारातदेखील प्रथम क्रमांक पटकविला.

अभियांत्रिकी महाविद्यालयातील क्रीडा विभागाने दि. १७, १८ आणि १९ एप्रिल २०२५ रोजी अंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा ''पी. व्ही. जी. अग्नी'' चे आयोजन केले. यामध्ये फुटबॉल मुले, बास्केटबॉल मुले आणि मुली, व्हॉलिबॉल मुले आणि मुली या क्रीडा प्रकारांचा समावेश होता. या क्रीडा स्पर्धेत एकूण ३० महाविद्यालयातील ३२० पेक्षा अधिक मुले आणि मुली खेळाडूंनी सहभाग घेतला होता. क्रीडा स्पर्धांचे उद्‌घाटन संचालक प्रा. राजेंद्र कडूसकर, आणि प्र. प्राचार्य डॉ. मनोज तारांबळे यांनी केले. संचालक श्री. सुनील रेडेकर यांनी या स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. विजयी खेळाडूंसाठी बक्षीस वितरण कार्यक्रमाचे आयोजन करून बक्षिसे देण्यात आली. या स्पर्धेचे आयोजन क्रीडाप्रमुख डॉ. नामदेव बन्ने यांनी विद्यार्थी क्रीडा प्रतिनिधी, कु. करण झरेकर (अंतिम वर्ष इ. ॲण्ड टी. सी.) आणि महाविद्यालयातील खेळाडूंच्या मदतीने केले.

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !**

**एनबीए (नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रिडीटेशन)**

एआयसीटीई आणि नियामक संस्थांनी मान्यता दिलेल्या अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञानातील तांत्रिक शैक्षणिक संस्थांद्वारे चालवण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमांच्या गुणात्मक क्षमतेचे मूल्यांकन करण्यासाठी एआयसीटीई द्वारे राष्ट्रीय मान्यता मंडळाची (एनबीए) स्थापना केली गेली. एनबीए एक स्वतंत्र स्वायत्त संस्था म्हणून अस्तित्वात आली. ज्याचा मुख्य उद्देश आहे तांत्रिकी शिक्षणाची गुणवत्ता आणि सुसंगतता सुनिश्चित करणे. एनबीए, तांत्रिक संस्थांच्या अभ्यासक्रमांचे मूल्यमापन, निकष आणि त्याच्या

समित्या आणि कौन्सिलने घालून दिलेल्या मापदंडांच्या आधारे करते. एनबीएच्या सक्षम प्राधिकरणाने ठरविल्यानुसार, यामध्ये संस्थात्मक दृष्टी, ध्येय आणि उद्दिष्टे, संस्था आणि शासन, पायाभूत सुविधा, अध्यापन आणि शिक्षणाची गुणवत्ता, अभ्यासक्रमाची रचना आणि त्यानुसार पुनरावलोकन, समर्थन सेवा (लायब्ररी, प्रयोगशाळा, उपकरणे, संगणक सुविधा इ.) आणि इतर कोणत्याही गोष्टींचा समावेश असू शकतो. हे संस्थांना उद्योगाच्या गरजेनुसार पदवीधर तयार करण्यात मदत करते.

एनबीए चे फायदे - एन बी ए मान्यताप्राप्त कार्यक्रमांमध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना खात्री दिली जाऊ शकते की त्यांना उच्च शैक्षणिक गुणवत्ता आणि व्यावसायिक प्रासंगिकतेचे शिक्षण मिळेल आणि कॉर्पोरेट जगाच्या गरजा अभ्यासक्रम, क्रियाकलाप आणि प्रक्रियांमध्ये चांगल्या प्रकारे एकत्रित केल्या आहेत.

एनबीए मूल्यमापन - एनबीए तज्ज्ञ समितीने खालील कार्यक्रमांचे मूल्यांकन करण्यासाठी ११ ते १३ एप्रिल २०२५ या कालावधीत महाविद्यालयाला भेट दिली.

१) संगणक अभियांत्रिकी २) माहिती तंत्रज्ञान व
३) यांत्रिक अभियांत्रिकी

तज्ज्ञ समितीच्या अध्यक्षांनी सर्व केंद्रीय सुविधा, प्रथम वर्ष प्रयोगशाळा, ग्रंथालय, कार्यशाळा, क्रीडा संकुल इत्यादींना भेट दिली. मार्गदर्शन, तक्रार निवारण, कारकीर्द मार्गदर्शन, अभिप्राय, सहशैक्षणिक उपक्रम, अंदाजपत्रक इत्यादी विविध प्रक्रियाही अध्यक्षांना समजावून सांगण्यात आल्या.

दोन मूल्यांकनकर्त्यांनी संबंधित कार्यक्रम, वर्ग, प्रयोगशाळा, पायाभूत सुविधा, विद्यार्थी प्रकल्प इत्यदींना भेट दिली. संपूर्ण दस्तावेजीकरण आणि सादरीकरणाच्या माध्यमातून अध्यापन प्रक्रियेचे मूल्यांकन केले गेले.

***


## संस्थेस देणगी पाठविण्यासंबंधीची माहिती

**या देणगीवर आयकर खात्याच्या कलम ८० जी नुसार आयकरात ५०% सवलत मिळते.**

**The details of our bank account are as follows :**

| | | |
|---|---|---|
| Bank A/c Name | : | **Pune Vidyarthi Griha** |
| Bank Name | : | **Bank of Baroda** |
| Branch | : | **Sadashiv Peth, Pune 411030** |
| Saving A/c No. | : | **04500100009842** |
| RTGS/NEFT/ IFSC CODE | : | **BARB0SADASH** |
| | | **The fifth character is numeric 'zero'.** |
| Swift Code | : | **BARBIN BBPCB** |
| MICR Code | : | **411012009** |

**बँकेमध्ये देणगी पाठविल्यानंतर रकमेव्यतिरिक्त नाव, पत्ता असा कोणताही संदर्भ संस्थेस प्राप्त होत नाही त्यामुळे कृपया आपण वरील खात्यावर देणगी पाठविल्यानंतर खालील फोन नं. वर किंवा ई मेलवर सविस्तर माहितीसाठी संपर्क करून कळवावे. फोन नं. - ०२० २४४७०९२७, २४४७०५७३ ई मेल :** pvgheadoffice@gmail.com

# कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्स, पुणे

**संचालक : डॉ. राजेंद्र सं. कांबळे**
**प्राचार्य : डॉ. संजयकुमार गायकवाड**

## आंतरराष्ट्रीय परिषद

दि. २५ मार्च २०२५ रोजी ''वाणिज्य आणि व्यवस्थापन, अर्थशास्त्र, माहिती तंत्रज्ञान आणि विज्ञानातील उदयोन्मुख प्रवाह'' या विषयावर एक दिवसीय ऑनलाइन बहुविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन वाणिज्य आणि व्यवस्थापन विभागाच्या वतीने करण्यात आले होते. या परिषदेमध्ये वेगवेगळ्या देशांमधून आणि राज्यातून रिसर्च पेपर मागविण्यात आले होते.

या परिषदेमध्ये राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील बहुशाखीय तज्ञांनी मार्गदर्शन केले. या परिषदेचे उद्‌घाटन प्रा. डॉ. राजेश दुबे, संचालक, यूजीसी एम. एम. टी. सी., राजस्थान यांच्या हस्ते तसेच चेअर पर्सन म्हणून जर्मनीच्या तज्ञ मार्गदर्शिका डॉ. निहारीका सिंग आणि संचालक प्रा. डॉ. राजेंद्र कांबळे आणि संस्थेचे सर्व पदाधिकारी तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, IQAC समन्वयक, विभागप्रमुख यांच्या हस्ते करण्यात आले. या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये प्रथम प्रमुख वक्ते म्हणून परदेशातील थायलंड विद्यापीठातील डॉ. अरुण चैनीत यांनी ''उद्योग व्यवस्थापन, तंत्रज्ञान आणि उद्योजकांची भूमिका'' या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच या सत्राचे अध्यक्ष म्हणून डॉ. निधी अरगडे, महाराजा सयाजीराव विद्यापीठ बडोदा, गुजरात यांनी ''देशाच्या शाश्वत विकासासाठी फिनटेक'' या विषयावर मार्गदर्शन केले.

द्वितीय सत्रामध्ये प्रमुख वक्ते म्हणून परदेशातील डॉ. अभिजीत तरवडे, ताश्कंद युनिव्हर्सिटी उजबेकीस्थान यांचे ''डेटा विश्लेषणाच्या पलीकडे: जनरेटिव्ह एआय सह अंतर्दृष्टीचे कथांमध्ये रूपांतर करणे'' या विषयावर, तसेच अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. अनिल अडसुळे बोर्ड ऑफ स्टडीज सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचे ''वाढती उद्योजकता'' या विषयावर मार्गदर्शन लाभले.

तृतीय सत्रामध्ये प्रमुख वक्ते म्हणून चेन्नईचे श्रीराम नटराजन यांनी ''उच्च शिक्षणातील कृत्रिम बुद्धिमत्ता आव्हाने आणि संधी'' आणि अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. गौड गोपाल बनीक, गुवाहाटी युनिव्हर्सिटी आसाम यांनी ''उच्चशिक्षण आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०'' या विषयावर मार्गदर्शन केले.

चतुर्थ सत्रामध्ये प्राचार्य डॉ. रणजीत पाटील, बोर्ड ऑफ स्टडीज संगणक विद्याशाखा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांनी ''कृत्रिम बुद्धिमत्तेचा उदय आणि त्याचे व्यक्तीच्या जीवनावर होणारे परिणाम'', तसेच अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. अनिल दडस वर्क लाइफ मेंबर आणि उपप्राचार्य, दहिवडी कॉलेज, दहिवडी यांनी ''ग्रामीण आणि शहरी भागातील शिक्षण पद्धतीचे विश्लेषण'' या विषयावर मार्गदर्शन केले.

या परिषदेमध्ये ऑनलाईन पद्धतीने शंभर पेक्षा जास्त सहभागींनी संशोधन प्रकल्पाचे सादरीकरण केले. या सादरीकरणाचे परीक्षण चार भागांमध्ये गुगल लिंकच्या माध्यमातून ऑनलाइन पद्धतीने करण्यात आले. याचे परीक्षण प्रा. डॉ. एम. जी. मुल्ला, अबेदा इनामदार कॉलेज, पुणे, प्राचार्य डॉ. एच. आर. कुलकर्णी रायसोनी कॉलेज पुणे, प्रा. डॉ. शिवाजी टाकळकर, ग्रामोक्ती मंडळाचे कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय नारायणगाव प्रा. डॉ. संभाजी जाधव, भाई किसनराव देशमुख महाविद्यालय, चाकूर जि. लातूर प्रा. डॉ. विजय निकम. आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज मंचर प्रा, डॉ. श्रीकांत फुलसुंदरग्रामोक्ती मंडळाचे कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय नारायणगाव, प्रा. डॉ. मंगेश फुटाणे माळेगाव कॉलेज बारामती आणि प्रा. डॉ. योगेश चौधरी डी. वाय. पाटील कॉलेज, पुणे यांनी ऑनलाइन पद्धतीने संशोधन प्रकल्पाचे मूल्यमापन केले.

या परिषदेमध्ये २६० पेक्षा जास्त संशोधन प्रकल्प (रिसर्च पेपर) जमा झाले असून ते International Journal of Advance and Applied Research (Impact Factor ८.१४) या आंतरराष्ट्रीय मासिकामध्ये प्रकाशित करण्यात आले आहेत. या परिषदेचा निरोप समारंभ संध्याकाळी ५.३० वाजता प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. प्रशांत शर्मा गुवाहाटी विद्यापीठ आसाम आणि अध्यक्ष प्रा. डॉ. किशोर निकम (बोर्ड ऑफ स्टडीज सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) पुणे यांच्या उपस्थितीत पार पडला.

या परिषदेचे आयोजन संस्थेचे सर्व संचालक व पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली संचालक व विभागप्रमुख डॉ. राजेंद्र कांबळे, प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड, परिषद निमंत्रक प्रा. रेखा जोशी, आय.क्यू.ए.सी समन्वयक डॉ. स्वाती जोशी, संगणकशास्त्र विभागप्रमुख व परिषद समन्वयक प्रा. महादेव पिसाळ, वाणिज्य आणि व्यवस्थापन विभागप्रमुख तसेच परिषद समन्वयक डॉ. ज्ञानदेव निटवे, ॲनिमेशन विभागप्रमुख प्रा. सिद्धार्थ खंडागळे तसेच महाविद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर वृंद ही परिषद यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले. ***

## * कॉलेज ऑफ सायन्स अ‍ॅण्ड कॉमर्स, पुणे *




←
दि. २५ मार्च २०२५ रोजी ''वाणिज्य आणि व्यवस्थापन, अर्थशास्त्र, माहिती तंत्रज्ञान आणि विज्ञानातील उदयोन्मुख प्रवाह'' या विषयावर एक दिवसीय ऑनलाइन बहुविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय परिषद प्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना संचालक डॉ. राजेंद्र कांबळे

ऑनलाईन परिषद यशस्वीरितत्या पार पाडणारे प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड आणि प्राध्यापक वृंद ↓



## विद्याभवन–घाटकोपर, मुंबई शाखा

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

### पुणे विद्यार्थी गृह विद्याभवन शाळेची अभूतपूर्व यशोमुद्रा!

मुंबई उपनगरात ''मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा-टप्पा २'' अंतर्गत प्रथम क्रमांकाचा बहुमान प्राप्त झाला.

शिक्षण क्षेत्रात सतत नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून प्रगतीचा नवा अध्याय लिहिणाऱ्या विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर या प्रशालेने आणखी एक उल्लेखनीय कामगिरी केली आहे. महाराष्ट्र शासनाच्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनांतर्गत राबविण्यात आलेल्या ''मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा-टप्पा २'' या अभियानात मुंबई उपनगर जिल्हास्तरावर प्रथम क्रमांकाचे पारितोषिक विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाने पटकावले आहे.

हा टप्पा ५ ते १५ सप्टेंबर २०२४ दरम्यान संपूर्ण महाराष्ट्रात पार पडला होता. राज्यभरातील सर्व शाळांचे मूल्यमापन, पायाभूत सुविधा, शासनाचे धोरण अंमलबजावणी, शैक्षणिक गुणवत्ता व उपक्रम या महत्त्वपूर्ण निकषांवर करण्यात आले.

विद्याभवन शाळेने वरील सर्वच निकषांवर उत्कृष्ट कामगिरी करीत मुंबई उपनगर जिल्ह्यातून प्रथम क्रमांक मिळविला आहे व ११ लाख रुपयांचे मानाचे पारितोषिक पटकावले आहे.

या यशामागे मुख्याध्यापिका सौ. योगिनी पोतदार, उपमुख्याध्यापिका सौ. ज्योती देसाई तसेच सर्व शिक्षकवृंदाचा, शिक्षकेतर कर्मचारीवर्गाचा आणि विद्यार्थ्यांचा समर्पित प्रयत्न आहे. शाळेतील शिस्त, गुणवत्ता, उपक्रमशीलता आणि आधुनिक दृष्टिकोन यामुळे आज विद्याभवनने आपला ठसा उमटवला आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सदैव प्रयत्नशील असलेल्या विद्याभवन शाळेतील ९१ विद्यार्थी मागील वर्षी शिष्यवृत्ती परीक्षेत मेरिटमध्ये आले होते. तसेच खेळातही देशपातळीवर प्रतिनिधित्व करत आहेत. याशिवाय इ.१०वी च्या १००% निकालाचे सातत्य गेली अनेक वर्षे संस्था टिकवून आहे.

**या अभूतपूर्व यशाच्या पार्श्वभूमीवर कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे आणि कार्यवाह श्री. संजय गुंजाळ तसेच संचालक मंडळ यांनी संपूर्ण टीमचे कौतुक करत, पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**

## विद्याभवन पूर्व प्राथमिक सेमी इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**समन्वयिका : श्रीमती शुभांगी मच्छिंद्र जाधव**

### गुढीपाडवा

''गुढी उभारली ज्ञानाची सदैव आनंदी राहण्याची'' रविवार दि. ३१ मार्च २०२५ रोजी गुढीपाडव्याची सुट्टी असल्याने शुक्रवार दि. २८ मार्च २०२५ रोजी पूर्व प्राथमिक सेमी इंग्रजीच्या विद्यार्थ्यांनी 'गुढीपाडवा' सण साजरा केला. त्यासाठी मोठा शिशु च्या काही विद्यार्थिनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून आल्या होत्या व सर्व विद्यार्थिनींनी छोट्याश्या गुढ्या ही आणल्या होत्या. या सर्व गुढ्या शाळेच्या आवारात मांडण्यात आल्या. त्यासमोरच मोठी गुढी उभारण्यात आली. अगदी पारंपरिक पध्दतीने जसे की आंब्याचा टहाळा, कडूलिंबाची पाने, साखरेच्या गाठी, हार, साडी, कलश तसेच काठीला गंध लावून गुढी सजवण्यात आली. प्रथम सेमी विभागाच्या समन्वयिका श्रीमती शुभांगी जाधव यांनी गुढीची पूजा केली. या वेळी पूर्व प्राथमिक इंग्रजी विभागाच्या समन्वयिका श्रीमती लक्ष्मी गोपालकृष्णन व पर्यवेक्षिका श्रीमती पूजा फरिया याही उपस्थित होत्या. नंतर सर्व शिक्षकांनी पूजा करून गुढीला शेवबुंदीचा नैवद्य दाखविला. सर्व मुले व शिक्षकांनी गुढीला नमस्कार करून येणाऱ्या नवीन मराठी वर्षाच्या व गुढीपाडव्याच्या एकमेकांना शुभेच्छा दिल्या. सर्व विद्यार्थ्यांना शेवबुंदीचा प्रसाद देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

**फन डे**

परीक्षा संपल्या व शाळेचा शेवटचा दिवस म्हणजेच दि. ११ एप्रिल २०२५ रोजी विद्यार्थ्यांनी 'फन डे' साजरा केला. 'फन डे' साठी सर्व शिक्षकांनी संगीत खुर्ची, बॉटल भोवती रिंग टाकणे, बादलीत चेंडू टाकणे, मनोरा रचणे अशा विविध खेळांचे नियोजन केले होते. या सर्व खेळांचा विद्यार्थ्यांनी मनमुराद आनंद लुटला. खेळामध्ये विजयी ठरलेल्या विद्यार्थ्यांना समन्वयिका श्रीमती शुभांगी जाधव यांच्या हस्ते भेटवस्तू देण्यात आल्या. यानंतर विद्यार्थ्यांनी गाण्यावर नृत्य केले. सर्व विद्यार्थ्यांना खाऊ म्हणून पावभाजी, जिलेबी, चिप्स व आईस्क्रीम देण्यात आले. सर्व शिक्षकांनी मुलांना उन्हाळ्याच्या सुट्टीच्या शुभेच्छा देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

## विद्याभवन पूर्व प्राथमिक इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**पर्यवेक्षिका : सौ. पूजा फरिया (इंग्रजी माध्यम)**

**गुढीपाडवा**

गुढीपाडवा सण अत्यंत आनंदात साजरा केला. विद्यार्थ्यांनी उत्साहाने समृद्धी आणि शुभेच्छांचे प्रतिक असलेल्या रंगीबेरंगी गुढ्या आणल्या होत्या. शिक्षकांनी आकर्षक रांगोळी काढून संपूर्ण परिसर सुशोभित केला होता. उत्सवाच्या समारोप प्रसंगी सर्वांना शेव व बुंदीचा प्रसाद वाटण्यात झाला.

**फन डे सेलिब्रेशन**

प्राथमिक विभागात प्रवेश घेणाऱ्या सिनियर के. जी. च्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक वर्षाचा शेवटचा दिवस दि. ११ एप्रिल २०२५ रोजी 'फन डे' आयोजित करण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी हॉप, स्किप अँड जंप, ड्रिब्लिंग द बॉल, टग ऑफ वॉर, बास्केटबॉल आणि अशा अनेक मजेदार खेळात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षक आणि मित्रांसोबत वेळ घालवत खूप आनंद लुटला.

पाव भाजी, जिलेबी, वेफर्स आणि आईस्क्रीम यांचा आस्वाद घेत वातावरण अधिकच आनंदमय झाले. प्रत्येक विद्यार्थ्याला एक गिफ्ट आणि चॉकलेट गुडी बॅग देण्यात आली, विद्यार्थ्यांसाठी हा दिवस अविस्मरणीय ठरला.

## विद्याभवन माध्यमिक मराठी व कनिष्ठ महाविद्यालय

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**मुख्याध्यापिका : श्रीमती योगिनी राजेंद्र पोतदार**

**क्षेत्रभेट**

दि. ११ मार्च २०२५ रोजी विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय मुंबई अणि शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई उत्तर विभाग समग्र शिक्षा समावेशित शिक्षण यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी नेहरु विज्ञान केंद्र वरळी, मुंबई येथे क्षेत्रभेटीचे आयोजन करण्यात आले होते.

या क्षेत्रभेटीमध्ये आपल्या बृहन्मुंबई उत्तर विभागातील १७८ विद्यार्थी, शिक्षक, पालक यांनी सहभाग नोंदविला.

विशेष गरजा असणाऱ्या बालकांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच त्यांच्यामध्ये असलेल्या अध्ययन शैलीनुसार सुप्तगुणांचा विकास होण्यासाठी, तसेच विद्यार्थ्यांना विज्ञान आणि तंत्रज्ञान विषयाची आवड निर्माण होण्याच्या दृष्टीने क्षेत्रभेटीचे आयोजन करण्यात आले होते.

विज्ञानाच्या विविध संकल्पना, रेल्वेचे वाफेचे इंजिन, ट्रामचा डबा, हवाई दलाचे विमान, विज्ञान शास्त्रज्ञांचे पुतळे, प्रकाश, ध्वनी, गंध, स्पर्श, चव अशा ज्ञानेंद्रियांशी निगडित विज्ञान प्रयोग विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभवले.

विश्वाच्या उत्पत्तीपासून ते कृत्रिम बुद्धिमत्ते पर्यंतचे प्रदर्शन पाहताना विद्यार्थी भारावून गेले होते. तसेच वैज्ञानिक प्रयोग, त्रिमितीय विज्ञान शो, तारांगण,

आकाशदर्शन हे देखील विद्यार्थ्यांना अनुभवता आले. वातानुकूलित प्रवासाबरोबरच पंचपक्वान्नाचा सर्वांनी आस्वाद घेतला.

या क्षेत्रभेटीत आपल्या प्रशालेतील इ. ७वी क चा विद्यार्थी कु. रोहन विजय पवार हा सहभागी झाला होता.

## विद्याभवन प्राथमिक इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**मुख्याध्यापिका : श्रीमती अनघा संतोष सावंत**

### विद्यार्थिनी कु. ओमी सचिन दुबले इ. ४थी हिचा मुंबई पोलिस आयुक्तालयामध्ये आयोजित कार्यक्रमात गौरव

कु. ओमी सचिन दुबले इ. ४थी हिला आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने दि. ८ मार्च २०२५ रोजी मुंबई पोलिस आयुक्तालयात आयोजित केलेल्या कार्यक्रमात मुंबईचे पोलिस आयुक्त श्री. विवेक फणसाळकर आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीमध्ये गौरविण्यात आले. कु. ओमी हिने कराटे या क्रीडा प्रकारात कुमिते व काथा मध्ये जिल्हास्तरावर गोल्ड मेडल मिळवले. कु. ओमी हिच्या कौशल्यपूर्ण आणि प्रशंसनीय कार्याची दखल घेत बृहन्मुंबई पोलिस विभागाने तिचा सन्मान केला. कु. ओमी हिस उज्ज्वल भविष्यासाठी अनेक शुभेच्छा दिल्या व तिचे कार्य असेच प्रेरणादायी ठरावे आणि ती सतत यशस्वी होत राहो ही सदिच्छा व्यक्त केली.

## विद्याभवन नं. २ माध्यमिक इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**मुख्याध्यापक : श्री. सुनील भालचंद्र पाटील**

### NMMS २०२४-२५ परीक्षेचा निकाल

भारत सरकारातर्फे इ.८वी तील राष्ट्रीय आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी घेतल्या जाणाऱ्या NMMS (National Means Cum Merit Scholarship) परीक्षा २०२४-२५ या शिष्यवृत्ती परीक्षेत विद्याभवन हायस्कूल नं. २, घाटकोपर मधील एकूण २ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती मिळविली. या शिष्यवृत्ती प्राप्त प्रत्येक विद्यार्थ्याला शासनातर्फे इ. ९वी ते इ. १२वी पर्यंत रु. १२,०००/- याप्रमाणे एकूण रु. ४८,०००/- शिष्यवृत्ती मिळते.

**NMMS परीक्षा २०२४-२५ शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे-**

१. कु. भाटकर आयुष सुशांत.

२. कु. भट अंजली अनिल.

यशस्वी विद्यार्थ्यांचे पुणे विद्यार्थी गृह संचालक मंडळ, शाळेचे मुख्याध्यापक, पदाधिकारी, सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी हार्दिक अभिनंदन केले व पुढील यशस्वी वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

### ग्रीन झोन प्रोजेक्ट

दि. २ एप्रिल २०२५ रोजी प्रशालेच्या आप्पासाहेब गरगटे सभागृहात ग्रीन झोन प्रोजेक्ट अंतर्गत 'प्लॅस्टिक मुक्त भारत' हा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमासाठी ग्रीन झोन प्रोजेक्ट डायरेक्टर श्रीमती आशा जनार्दन, श्रीमती बिंदू जनार्दन, श्रीमती गोपीनाथन, श्रीमती माधुरी बोर्डे आणि त्यांची टीम तसेच कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, मराठी माध्यमाच्या मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार, उपमुख्याध्यापिका श्रीमती ज्योती देसाई, इंग्रजी माध्यमांचे मुख्याध्यापक श्री. सुनील पाटील, उपमुख्याध्यापिका श्रीमती लता नायर, समन्वयिका श्रीमती सरला, पर्यवेक्षक श्री. पवार आणि दोन्ही माध्यमाचे शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपमुख्याध्यापिका श्रीमती लता नायर यांनी केले. पाहुण्यांचे स्वागत करून त्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात मराठी माध्यमाची विद्यार्थिनी कु. आसावरी पाटील हिने ग्रीन झोन प्रोजेक्ट अंतर्गत प्लॅस्टिक प्रदूषण कसे कमी करावे याबाबत आपले मत मांडले, कु. सानवी आव्हाड हिने 'स्वच्छ भारत सुंदर भारत आपली जबाबदारी' याविषयी आपले विचार मांडले. इंग्रजी माध्यमाची विद्यार्थिनी

कु. शाल्मली मोहिते हिने ग्रीन झोन प्रोजेक्ट याविषयी आपले विचार मांडले. या ग्रीन झोन प्रोजेक्ट अंतर्गत सॅनिटरी नॅपकिन विल्हेवाट लावण्याच्या दोन मशीन्स दोन्ही माध्यमांच्या शाळेला भेट देण्यात आल्या. या प्रोजेक्ट अंतर्गत प्लॅस्टिक मुक्त भारत या कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभागासाठी प्रोत्साहनपर बक्षिसे खालील विद्यार्थिनींना मिळाली.

| मराठी माध्यम | इंग्रजी माध्यम |
|---|---|
| कु. ईश्वरी एरंडे | कु. शाल्मली मोहिते |
| कु. अवंतिका वरे | कु. वेदा काकड |
| कु. नीलाक्षी दिघे | कु. पूर्वा जठार |

तसेच दोन्ही विभागांच्या मुख्याध्यापकांनाही पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले. प्रशालेच्या उत्कृष्ट कामगिरीसाठी प्रोत्साहनपर ट्रॉफीचा स्वीकार कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांनी केला. श्रीमती आशा आणि श्रीमती गोपीनाथन यांनी विद्यार्थ्यांशी प्रोजेक्ट अंतर्गत संवाद साधला. कु. शाल्मली मोहिते हिच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

***

## * विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई *





फन डे सेलिब्रेशन मध्ये विविध खेळ खेळताना
पूर्व प्राथमिक इंग्रजी विभागातील विद्यार्थी



मुंबईचे पोलिस आयुक्त श्री. विवेक फणसाळकर
आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या हस्ते
सन्मानचिन्ह स्वीकारताना
विद्यार्थिनी कु. ओमी सचिन दुबले, इ. ४ थी

## ✻ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ✻



गुढीपाडवा साजरा करताना
पूर्व प्राथमिक इंग्रजी विभागाच्या समन्वयिका
श्रीमती लक्ष्मी गोपालकृष्णन व
पर्यवेक्षिका श्रीमती पूजा फरिया, शिक्षक वर्ग



शिक्षण उपसंचालक कार्यालय मुंबई आणि
शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई
उत्तर विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने
दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी नेहरू विज्ञान केंद्र, वरळी
येथे आयोजित क्षेत्रभेटीत सहभागी
माध्यमिक मराठी विभागातील विद्यार्थी
कु. रोहन पवार इयत्ता ७वी क




ग्रीन झोन प्रोजेक्ट अंतर्गत 'प्लास्टिक मुक्त भारत' या कार्यक्रम प्रसंगी उपस्थित कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार, मुख्याध्यापक श्री. सुनील पाटील, समन्वयिका श्रीमती सरला नरेंद्रन, ग्रीन झोन प्रोजेक्ट डायरेक्टर श्रीमती इंदुमती गोपीनाथन, श्रीमती आशा जनार्दन व श्रीमती बिंदू जनार्दन

# नेरूळ शाखा, नवी मुंबई

## विद्याभवन प्राथमिक इंग्रजी शाळा

### नेरूळ शाखा, नवी मुंबई

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**

**प्र. मुख्याध्यापिका : सौ. मनीषा मुळीक**

**शिवजयंती**

दि. १९ फेब्रुवारी २०२५ रोजी सर्व शिक्षकवृंद आणि विद्यार्थी यांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरूवात झाली. विद्यार्थ्यांनी शिवगर्जना, पोवाडे व भाषणे या माध्यमातून शिवजयंती उत्साहाने साजरी केली. 'झुलतो पाळणा बाळ शिवाजीचा', 'राजा आला जी', या गाण्यांवर आधारित नृत्ये सादर केली. शाहिस्तेखानाची बोटे छाटण्याचा प्रसंग नाट्यमय रूपात सादर केला. या दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराज, माता जिजाऊ, महाराणी सईबाई यांच्या वेशभूषा परिधान केल्या होत्या. याप्रसंगी शिवाजी महाराजांनी युद्धासाठी वापरलेली वेगवेगळी शस्त्रे, चिलखत, जिरेटोप, पोशाखादी विद्यार्थ्यांनी बनवलेल्या वस्तूंचे प्रदर्शन भरविण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांनी हे प्रदर्शन पाहिले. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शिक्षिका श्रीमती अनिता परदेशी यांनी केले.

**मराठी राजभाषा दिन**

दि. २७ फेब्रुवारी २०२५ रोजी कवी कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस 'मराठी राजभाषा दिन' म्हणून साजरा केला. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापक श्री. गोरख कदम व समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक यांच्या हस्ते कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरूवात करण्यात आली. या दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी मराठी भाषेतील पोवाडे, नृत्ये व भाषणे या माध्यमातून मायबोली मराठीचे महत्त्व सांगितले. श्री. दिनेश मिसाळ यांनी विद्यार्थ्यांना जगामध्ये एकूण किती भाषा आहेत? आपल्या देशात एकूण किती भाषा आहेत? अशी प्रश्नोत्तरे करून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. आपल्या देशात एकूण २२ भाषांना राजभाषेचा दर्जा मिळालेला असून त्यापैकी मराठी ही एक भाषा आहे. आपण आपल्या मराठी भाषेच्या सन्मानाबरोबरच इतर भाषांचाही सन्मान केला पाहिजे, असे मोलाचे मार्गदर्शन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. आपल्या मराठी भाषेला नुकताच अभिजात भाषेचा दर्जा मिळालेला असून २०१३ पासून महाराष्ट्र शासनाने कवी कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस हा राजभाषा दिन म्हणून साजरा करण्याचे जाहीर केले आहे, अशी माहिती समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक यांनी विद्यार्थ्यांना दिली. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शिक्षिका श्रीमती अनिता परदेशी यांनी केले.

**राष्ट्रीय विज्ञान दिवस**

दि. २८ फेब्रुवारी २०२५ रोजी विज्ञान दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास मुख्याध्यापक श्री. गोरख कदम, समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक, शिक्षकवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते. सर सी. व्ही. रमण यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरूवात झाली. या दिवशी विद्यार्थ्यांनी विज्ञानावर आधारित अनेक प्रकल्पांचे प्रदर्शन भरवले होते. यामध्ये नैसर्गिकरित्या पाणी फिल्टर करणे, ज्वालामुखीचा उद्रेक, फुफ्फुसांचे कार्य, पवनचक्कीचे कार्य इ. प्रकल्प सादर केले. श्री. गोरख कदम व श्री. पांडुरंग मुळीक तसेच सर्व शिक्षक व विद्यार्थी यांनी प्रकल्पांची पाहणी केली. १९२८ मध्ये सर सी. व्ही. रमण यांनी 'रामन इफेक्ट' चा शोध लावला होता. त्यानिमित्त दि. २८ फेब्रुवारी हा दिवस दरवर्षी भारतात 'राष्ट्रीय विज्ञान दिन' म्हणून साजरा केला जातो. 'रामन इफेक्ट' चा शोध लावल्याबद्दल १९३० मध्ये सर सी. व्ही. रमण यांना भौतिकशास्त्रातील नोबेल पारितोषिक प्राप्त झाले होते, अशी माहिती श्री. पांडुरंग मुळीक यांनी विद्यार्थ्यांना दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विद्यार्थी कु. ओनीयल कोटिमली इ. ४थी याने केले.

**बालसभा**

दि. ७ मार्च २०२५ रोजी विभागाच्या अग्नी हाऊसच्या बालसभेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी अभ्यास करत असताना नैराश्य येऊ देऊ नये. एखादी गोष्ट शक्य आहे असा आपण विचार केला तर ती गोष्ट शक्यच होते, आणि अशक्य आहे असा विचार केला तर ती अशक्यच बनते. त्यामुळे सकारात्मक विचार करा, असा संदेश देणाऱ्या नाटिकेचे सादरीकरण विद्यार्थ्यांनी नृत्याच्या स्वरूपात केले. काही विद्यार्थ्यांनी चित्रपटातील विविध गाण्यांवर नृत्य केले, तर एका विद्यार्थ्याने पियानो वादन केले. या बालसभेस कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, श्रीमती मनिषा मुळीक, मुख्याध्यापक श्री. गोरख कदम, समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक, शिक्षकवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते. उपस्थितांचे चॉकलेट व गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. बालसभेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या कला, टॅलेंट सादर केले जाते. यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होते. विद्यार्थ्यांनी बालसभेत नेहमीच सहभागी व्हावे, असे मार्गदर्शन कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनी केले. मन लावून अभ्यासही करा, यश तुम्हाला नक्कीच मिळेल असे मार्गदर्शन श्री. पांडुरंग मुळीक यांनी विद्यार्थ्यांना केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शिक्षिका श्रीमती अनिता परदेशी यांनी केले.

**संस्कार दिन उत्साहात साजरा**

दि. १० मार्च २०२५ रोजी माजी संचालक गुरूवर्य स्व. डॉ. शं. पां. किंजवडेकर यांचा जन्मदिवस ‘संस्कार दिन’ म्हणून साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास एस. आय. ई. एस. च्या संचालिका डॉ. दीपा दीक्षित प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. समाजसेविका श्रीमती तेजस्विनी अधिकारी, कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, ज्येष्ठ नागरिक संघ, नेरुळचे अध्यक्ष श्री. रविंद्र वाळवेकर, उपाध्यक्ष श्री. प्रभाकर गुमास्ते, सेक्रेटरी श्री. अजय माढेकर, श्री. विकास साठे, श्री. किरण सावंत, सर्व विभागांचे मुख्याध्यापक, समन्वयक, पर्यवेक्षक, इतर ज्येष्ठ नागरिक, शिक्षकवृंद, विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते. गुरूवर्य स्व. डॉ. शं. पां. किंजवडेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरूवात झाली. प्रमुख अतिथी डॉ. दीपा दीक्षित यांचा कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे व श्रीमती तेजस्विनी अधिकारी यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुस्तक, सन्मानचिन्ह व रोपटे देऊन सत्कार करण्यात आला. श्रीमती तेजस्विनी अधिकारी यांचाही कार्याध्यक्षांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुस्तक व रोपटे देऊन सत्कार करण्यात आला. डॉ. दीपा दीक्षित यांनी मराठी विषय शिकवणाऱ्या शिक्षकांनी केलेल्या संस्कारांच्या आठवणी सांगितल्या. प्रत्यक्ष काम केल्याने आपण घडतो हे सांगताना कॉलेज जीवनातील काही उदाहरणे दिली. कोणत्याही कामाची लाज बाळगू नका, असा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. कर्तृत्व, दातृत्व, नेतृत्व आणि वक्तृत्व या गुणांनी डॉ. शं. पां. किंजवडेकर कसे परिपूर्ण होते, हे डॉक्टरांच्या कन्या श्रीमती तेजस्विनी अधिकारी यांनी अनेक उदाहरणे देऊन स्पष्ट केले. कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांनी डॉ. शं. पां. किंजवडेकर यांच्या विविध गुणांविषयी सांगताना नेरुळ शाखेच्या उभारणीत डॉ. शं. पां. किंजवडेकर यांची महत्त्वाची भूमिका स्पष्ट केली. शिक्षक श्री. अविनाश कुलकर्णी यांनी संस्कार व संस्कृती या शब्दांचा गर्भितार्थ विद्यार्थ्यांना सांगितला. शिक्षिका श्रीमती कल्पना सोनार यांनी डॉक्टरांच्या आठवणींना उजाळा दिला. या कार्यक्रमात कु. वेदिका खोत आणि कु. शिवकृष्णा पुचा यांना माजी कार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे पुरस्कृत ‘डॉ. शं. पां. किंजवडेकर आदर्श विद्यार्थी’ म्हणून गौरविण्यात आले. डॉ. शं. पां. किंजवडेकर मेमोरियल फाउंडेशनमार्फत २० गरीब आणि होतकरु विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले. सूत्रसंचालन शिक्षिका श्रीमती ममता राक्षे यांनी केले. श्रीमती प्रिया थिय्यर यांनी आभार मानले. पसायदानाने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

# विद्याभवन प्राथमिक मराठी शाळा

## नेरूळ शाखा, नवी मुंबई

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**

**मुख्याध्यापिका : सौ. सुवर्णा दिनेश मिसाळ**

### अभिनंदनीय

रामकृष्ण मठ आणि रामकृष्ण मिशन आयोजित आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. विवेकोत्सव या कार्यक्रमाची प्रथम फेरी व अंतिम फेरी घेण्यात आली. कु. उल्का राजेश झगडे या विद्यार्थिनीची उत्कृष्ट वक्ता म्हणून निवड झाली. तिच्या भाषणाला प्रथम क्रमांक मिळाला. दि. ९ फेब्रुवारी २०२५ रोजी रामकृष्ण मिशन, खार, मुंबई येथे चॅम्पियन्स ट्रॉफी देऊन तिचा गौरव करण्यात आला. कु. उल्का झगडे हिचे संस्थेच्यावतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !

### शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षण

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व शैक्षणिक आराखडा २०२० या संदर्भात शिक्षकांना प्रशिक्षित करण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेतर्फे शिक्षक क्षमतावृद्धी प्रशिक्षण सर्व शिक्षकांनी यशस्वीरित्या पूर्ण केले.

### छत्रपती शिवाजी महाराज जयंती

छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरी करण्यात आली. मुख्याध्यापक श्री. गोरख कदम व समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक यांच्या हस्ते शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कु. उल्का झगडे हिने शिवगर्जना दिली. विद्यार्थ्यांनी शिवकालीन हत्यारे, राजमुद्रा आणि किल्ले यांच्या प्रतिकृती बनवून त्यांचे प्रदर्शन भरविले. विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून महाराजांच्या कार्याची माहिती सांगितली. महाराजांच्या जीवनावर आधारित पोवाडा, काव्यवाचन, नाटक आणि विविध नृत्य प्रकार इ. कार्यक्रम सादर केले. समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक यांनी विद्यार्थ्यांनी बनवलेल्या शिवकालीन वस्तू व साधनांचे कौतुक केले. महाराजांच्या जीवन कार्याविषयी थोडक्यात माहिती सांगितली. महाराजांचा एक तरी गुण अंगी बाणवा असे सांगून त्यांनी शिवजयंतीच्या शुभेच्छा दिल्या. 'हर हर महादेव', 'जय जिजाऊ, जय शिवराय', 'शिवछत्रपती शिवाजी महाराज की जय' या घोषणांनी सभागृह दुमदुमले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी कु. वेदश्री विश्वनाथ राक्षे हिने केले.

### अभिनंदनीय ! कृतज्ञता पुरस्कार

दि. २२ फेब्रुवारी २०२५ शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल यशवंतराव चव्हाण सेंटर, नवी मुंबईकडून विद्याभवन शैक्षणिक संकुलास कृतज्ञता पुरस्काराने गौरविण्यात आले. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक तसेच सर्व विभागांचे मुख्याध्यापक व शिक्षकांनी संकुलाच्या वतीने हा पुरस्कार स्वीकारला. मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या शासकीय उपक्रमात विद्याभवनने ठाणे जिल्ह्यातून अव्वल स्थान पटकावले आहे. गेल्या २१ वर्षापासून या शाळेचा एसएससी परीक्षेचा निकाल सतत १०० टक्के लागत आहे. या संकुलाने विविध स्पर्धा आणि परीक्षांमध्ये नावलौकिक प्राप्त केला आहे. यशवंतराव चव्हाण सेंटर, नवी मुंबई केंद्राचे अध्यक्ष प्रमोद कर्नाड, सचिव डॉ. अशोक पाटील, कोषाध्यक्ष भाऊसाहेब शिंगाडे, सुलेखनकार पद्मश्री अच्युत पालव आदि मान्यवरांच्या उपस्थितीत विद्याभवन शाळेला हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

### मराठी भाषा गौरव दिन

दि. २७ फेब्रुवारी २०२५ रोजी कवी कुसुमाग्रज यांची जयंती म्हणजेच मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, मुख्याध्यापक श्री. गोरख कदम व समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक यांच्या शुभहस्ते कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. इ. ३री ते इ. ७वीच्या विद्यार्थ्यांनी बनविलेले मराठीतील विविध साहित्य, शाब्दिक खेळ, उपक्रम यांचे प्रदर्शन भरविण्यात आले. इ. ४थीच्या विद्यार्थ्यांनी इंग्रजी शब्दाला मराठी पर्यायी शब्द या

विषयावर हस्तलिखित बनविले तर इ. सातवीच्या विद्यार्थ्यांनी सर्व नेत्यांवर आधारित कवितांचा संग्रह करून 'आदरांजली' हे हस्तलिखित तयार केले. या दोन्ही हस्तलिखितांचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. मराठी भाषेचा गौरव गाणाऱ्या व मराठी भाषेची महती सांगणाऱ्या गीतांचे व नृत्यांचे सादरीकरण विद्यार्थ्यांनी केले. मराठी साहित्याची ओळख त्यांनी भाषणातून करून दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी कु. विभूती गुंजाळ हिने केले.

**राष्ट्रीय विज्ञान दिन**

दि. २८ फेब्रुवारी २०२५ रोजी राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक, यांच्या शुभहस्ते डॉ. चंद्रशेखर रमण यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. नर्सरी ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी विज्ञानातील विविध संकल्पनांवर आधारित प्रयोग व प्रात्यक्षिके सादर केली. वैज्ञानिक प्रकल्पांचे प्रदर्शन भरविण्यात आले. विद्यार्थ्यांना आकाशातील तारे ही चित्रफीत दाखविण्यात आली. त्यांनी बनविलेल्या सर्वोत्कृष्ट प्रतिकृतींची निवड करून त्यांना बक्षीसे देण्यात आली. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना नियमितपणे वाचन करा, चुकांमधून शिका तसेच आपले घरातील किचन ही प्रयोगशाळा आहे, त्याचे निरीक्षण करा. राष्ट्रीय विज्ञान दिनाचे महत्त्व सांगून तो आपण का साजरा करावा याबद्दल मार्गदर्शन केले. विज्ञान प्रतिकृती बनविणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रथम तीन क्रमांकांची पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

**कथा अभिवाचन स्पर्धा यश**

वाचन संस्कृती मुलांमध्ये रुजावी, त्यांच्यात मराठी साहित्याची आवड आणि मराठी भाषेबद्दल गोडी वाढावी म्हणून पारिजात, मुंबई या संस्थेतर्फे शालेय विद्यार्थ्यांसाठी मराठी भाषा गौरव दिनानिमित्त घेण्यात येणारी सांघिक कथा अभिवाचन स्पर्धा 'गोष्ट मराठीची' दि. १ मार्च २०२५ रोजी संपन्न झाली. या स्पर्धेत इ. ५वी ते इ.७वी या गटातून विद्याभवन प्राथमिक मराठी शाळेने द्वितीय क्रमांक पटकावला. विजेते स्पर्धक १) कु. वेदश्री विश्वनाथ राक्षे २) कु. विभूती दत्तात्रय गुंजाळ

**विजेत्या संघाचे व त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे हार्दिक अभिनंदन!**

## विद्याभवन पूर्व प्राथमिक इंग्रजी शाळा

### नेरूळ शाखा, नवी मुंबई

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**
**पर्यवेक्षिका : सौ. अस्मिता सलगर**

**शिवजयंती उत्सव**

मंगळवार दि. १८ फेब्रुवारी २०२५ रोजी शिवजयंती उत्सव साजरा केला. विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज व राजमाता जिजाऊ यांच्या वेशभूषांमध्ये शाळेभोवती घोषणा देत फेरी काढली. या प्रसंगी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन कार्याविषयी माहिती सांगितली.

**होळी**

दि. १३ मार्च २०२५ रोजी होळीचा सण साजरा करण्यात आला. शाळेच्या मैदानावर होळी उभारण्यात आली होती. रंगीबेरंगी पोषाख घातलेले पूर्व-प्राथमिक तसेच माध्यमिक विभागाचे विद्यार्थीही अतिशय उत्साहाने सहभागी झाले होते. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, सर्व मुख्याध्यापक, समन्वयक, पर्यवेक्षिका, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी याप्रसंगी उपस्थित होते. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांच्या हस्ते होळीची विधिवत पूजा करून नारळ व नैवेद्य अर्पण करण्यात आला. त्यानंतर होळी पेटवून सर्व वाईट प्रवृत्ती, नकारात्मकता, संकटे यांचे होळीत दहन होवो. अशी प्रार्थना करण्यात आली. यानिमित्ताने उपस्थितांनी विद्यार्थ्यांना नैसर्गिक रंग लावून होळीच्या शुभेच्छा दिल्या.

# विद्याभवन माध्यमिक इंग्रजी

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**

**मुख्याध्यापिका : श्रीमती श्रीजा नायर**

## विज्ञान दिन

दि. २८ फेब्रुवारी २०२५ रोजी राष्ट्रीय विज्ञानदिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून बी.ए.आर.सी.चे नामवंत शास्त्रज्ञ श्री. अभिषेक बोराणा, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापक श्री. गोरख कदम, मुख्याध्यापिका श्रीमती श्रीजा नायर, शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरूवात वैज्ञानिक सी. व्ही. रमण यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून करण्यात आली. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांच्या शुभहस्ते प्रमुख अतिथी श्री. अभिषेक बोराणा यांचा सत्कार करण्यात आला. प्रमुख अतिथींनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांनी 'जिज्ञासू वृत्ती बाळगावी, पुस्तकांचे वाचन करावे, वैज्ञानिक दृष्टीकोन अंगी बाणवावा' असा महत्त्वपूर्ण सल्ला दिला. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनी माजी पंतप्रधान श्री. अटलबिहारी वाजपेयी यांनी 'जय जवान, जय किसान, जय विज्ञान' असा नारा दिला असल्याचे सांगितले. त्यांनी दैनंदिन जीवनातील विज्ञानाचे अन्यनसाधारण महत्त्व विशद केले. शिक्षक व विद्यार्थ्यांनीही आपल्या मनोगतातून विज्ञानाचे महत्त्व स्पष्ट केले. विज्ञान दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजूषा स्पर्धा घेण्यात आली. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी विविध वैज्ञानिक प्रयोगांचे सादरीकरण केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. संदीप गुप्ता यांनी केले. उपस्थितांचे आभार श्री. मनोज मयेकर यांनी मानले.

## अभिवाचन स्पर्धेतील सुयश

मराठी भाषा दिनाचे औचित्य साधून दि. १ मार्च २०२५ रोजी पारिजात, मुंबई या संस्थेतर्फे आयोजित 'गोष्ट मराठीची' सांघिक कथा अभिवाचन स्पर्धा कीर्ती कॉलेज, दादर येथे घेण्यात आली होती. या स्पर्धेत २४ शाळांमधील जवळपास ९६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. सदर स्पर्धेत कु. कृपा शितकर, कु. गार्गी कांबळे, कु. आर्या नाक्ती, कु. स्वरा माळी आणि कु. सुहानी कांबळे या विद्यार्थिनींनी मोठ्या गटातून प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. त्यांना सन्मानचिन्हे, प्रशस्तिपत्रक आणि रोख रक्कम रु. ३,०००/- देऊन गौरविण्यात आले. लहान गटातून कु. आर्या कदम, कु. वेदांती जाधव, कु. गार्गी गोळे, कु. प्रणाली कांबळे आणि कु. भूमी शितकर यांनी द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. त्यांना हे पारितोषिक विद्याभवन प्राथमिक मराठी बरोबर विभागून देण्यात आले. त्यांना सन्मानचिन्हे, प्रशस्तिपत्रके आणि रोख रक्कम रु. २,०००/- देऊन गौरविण्यात आले. शिक्षक श्री. जगन्नाथ कोळी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## समूहनृत्य स्पर्धेतील सुयश

दि. १३ मार्च २०२५ रोजी नवी मुंबई महानगरपालिका क्रीडा व सांस्कृतिक विभागातर्फे आंतरशालेय समूहनृत्य स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. सदर स्पर्धेत नवी मुंबई महानगर पालिकेतील ७२ शाळांनी सहभाग घेतला होता. या समूहनृत्य स्पर्धेत मोठ्या गटातून माध्यमिक इंग्रजी विभागाने द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. या स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना रोख रक्कम रु. ७,०००/- सन्मानचिन्हे व प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. श्रीमती अनुपमा कोटियन यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !**

## आनंददायी शनिवार

दि. १५ मार्च २०२५ रोजी नेरुळ शाखेत आनंददायी शनिवार या उपक्रमांतर्गत बांधन जनप्रतिष्ठान व विद्याभवन यांच्या संयुक्त विद्यमाने प्रसिध्द गझलकार श्री. आप्पा ठाकूर यांचा गझल गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. महानगरपालिकेचे जनसंपर्क अधिकारी श्री. महेंद्र कोंडे,

कवी श्री. रविंद्र पाटील, श्री. वैभव वऱ्हाडी, श्री. जितेंद्र लाड, श्री. बाळासाहेब पाटील, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, सर्व विभागांचे मुख्याध्यापक, पर्यवेक्षिका, शिक्षकवृंद, पालक व विद्यार्थी या कार्यक्रमास उपस्थित होते. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांच्या हस्ते श्री. आप्पा ठाकूर यांचा सत्कार करण्यात आला. इतर मान्यवरांनाही पुस्तकरूपी भेटवस्तू देण्यात आली. या कार्यक्रमात श्री. आप्पा ठाकूर यांनी सामाजिक बांधिलकीवर आधारित गझलगीते व कवितांचे सादरीकरण केले. यामध्ये जीवनमूल्ये, प्रेम, नातेसंबंधावर आधारित गझल, देव आणि विरह या गझल गीतांना उपस्थित रसिक श्रोत्यांनी मनमुराद दाद दिली. सर्वश्री महेंद्र कोंडे, रविंद्र पाटील, बाळासाहेब पाटील व जितेंद्र लाड यांनी श्री. आप्पा ठाकूर यांच्याबद्दल विचार व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. जगन्नाथ कोळी केले. उपस्थितांचे आभार श्रीमती वर्षा निकम यांनी मानले. ***

## * विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, नेरूळ शाखा, नवी मुंबई *



**पारिजात, मुंबई या संस्थेतर्फे मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित आंतरशालेय सांघिक कथा अभिवाचन स्पर्धेत द्वितीय क्रमांक पारितोषिक प्राप्त विद्यार्थिनी कु. विभूती दत्तात्रय गुंजाळ व कु. वेदश्री विश्वनाथ राक्षे यांचे अभिनंदन करताना कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ व मार्गदर्शक शिक्षिका श्रीमती नूतन गवांदे**




**नवी मुंबई महानगरपालिका भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मारक, ऐरोली याठिकाणी क्षेत्रभेट देताना प्राथमिक मराठी शाळेच्या विद्यार्थिनी**

## ※ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, नेरूळ शाखा, नवी मुंबई ※





विश्व समता कलामंच व डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारमंच यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय विश्व समता आदर्श शिक्षिका पुरस्कार प्राप्त विद्याभवन प्राथमिक मराठी शाळेच्या शिक्षिका श्रीमती नूतन गवांदे व श्रीमती आरती औचर

राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त आयोजित विज्ञान प्रकल्पांचे परीक्षण करताना शिक्षिका श्रीमती कविता तेंडुलकर व श्रीमती नूतन गवांदे





शिवजयंती निमित्त आयोजित शिवकालीन राजमुद्रा व शस्त्रांचे प्रदर्शन पाहताना समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक

## ※ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, नेरूळ शाखा, नवी मुंबई ※



पारिजात, मुंबई या संस्थेतर्फे मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित आंतरशालेय सांघिक कथा अभिवाचन स्पर्धेत इ. ८वी ते १०वी गटातून प्रथम क्रमांक पारितोषिक प्राप्त विजेत्या विद्यार्थिनींचे अभिनंदन करताना कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती श्रीजा नायर



पारिजात, मुंबई या संस्थेतर्फे मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित आंतरशालेय सांघिक कथा अभिवाचन स्पर्धेत इ. ५वी ते ७वी गटातून द्वितीय क्रमांक पारितोषिक प्राप्त विजेत्या विद्यार्थिनींचे अभिनंदन करताना कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती श्रीजा नायर, पर्यवेक्षिका श्रीमती अस्मिता सलगर व मार्गदर्शक शिक्षक श्री. जगन्नाथ कोळी





↑ राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विज्ञान प्रकल्पांचे निरीक्षण करताना प्रमुख अतिथी श्री. अभिषेक बोराणा व शिक्षक श्री. संदीप गुप्ता

← होळीची विधीवत पूजा करताना कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ

# विद्याप्रशाला हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय

## तळेगाव अंजनेरी शाखा, नाशिक

**उपकार्याध्यक्ष : श्री. अमोल म. जोशी**

**मुख्याध्यापक : श्री. शरद कोठावदे**

### उपकार्याध्यक्षांचा कर्मचाऱ्यांच्या वतीने सत्कार

दि. २४ मार्च २०२५ रोजी तळेगाव शाखेचे संचालक श्री. अमोल जोशी यांची संस्थेच्या उपकार्याध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल तळेगांव शाखेच्या शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वतीने प्राचार्य श्री. शरद कोठावदे व पर्यवेक्षक श्री. संजय जोशी यांच्या शुभहस्ते वस्त्र, पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी श्रीमती प्रीती राजपूत यांनी नवनियुक्त उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांचे अभिनंदन करताना शाखा व विद्यालयाच्या विकासात त्यांचे मार्गदर्शन मिळत असल्याचे आवर्जून नमूद केले. प्राचार्य श्री. शरद कोठावदे यांनी श्री. अमोल जोशी यांच्या कोणत्याही कामाचे सूक्ष्म नियोजन, दर्जेदार कामांबाबत असलेला आग्रह यांसारखे गुण काम करण्यास प्रोत्साहित करत असल्याचे आवर्जून सांगितले. यावेळी पालक शिक्षक संघाचे सहसचिव श्री. सीताराम मोरे यांनीही श्री. अमोल जोशी यांचा सत्कार केला. उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांनी सत्काराबद्दल सर्वांचे आभार मानताना संस्थेत कार्य करत असताना सर्व पदाधिकारी व संचालक मंडळाचे संपूर्ण सहकार्य मिळत असते, असे कृतज्ञतापूर्वक सांगितले. तसेच आगामी शैक्षणिक वर्षात विद्यार्थी संख्या वाढविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले. विद्यालयात प्रत्येक वर्गात बसविण्यात आलेले डिजिटल बोर्ड कार्यान्वित करण्यासाठी विशेष प्रयत्न करणारे श्री. साहेबराव ठोंबरे, श्री. लक्ष्मण चव्हाण, श्री. प्रकाश गवळी, श्रीमती रक्षा शिवदे या शिक्षकांचे त्यांनी अभिनंदन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. सुषमा अमृतकर, सूत्रसंचालन श्रीमती प्रतिभा ठाकूर यांनी केले तर आभार श्री. सुकदेव निंबेकर यांनी मानले.

### श्रमसंस्कार शिबीर

दि. ७ एप्रिल २०२५ रोजी विद्यालयात मुख्याध्यापक श्री. कोठावदे व पर्यवेक्षक श्री. संजय जोशी यांच्या अध्यक्षतेखाली सपकाळ इन्स्टिट्यूट तर्फे राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत श्रमसंस्कार शिबिर आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी सपकाळ इन्स्टिट्यूटच्या प्राचार्या व त्यांचा स्टाफ तसेच डॉक्टर मनीषा जेजुरकर व कोमल उपस्थित होत्या. डॉक्टर मनीषा जेजुरकर यांनी इ. ९वीच्या विद्यार्थिनींना 'मानसिक स्वास्थ' या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच कोमल यांनी किशोरवयीन मुलींच्या समस्या यावर मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थिनींना सॅनिटरी नॅपकिनचे वाटपही करण्यात आले. उपस्थितांचे आभार आरोग्य समिती प्रमुख सौ. भावसार यांनी केले.

### कै. दादासाहेब केतकर जयंती

दि. ९ एप्रिल २०२४ रोजी कुलगुरू कै. वि. गं. तथा दादासाहेब केतकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे व पर्यवेक्षक श्री. संजय जोशी यांनी प्रतिमा पूजन केले. श्री सुरेश वाघमारे यांनी कै. दादांचा जीवन प्रवास उलगडला. श्री. संजय जोशी यांनी आपल्या मनोगतातून संस्थेच्या स्थापनेत कुलगुरू कै. दादासाहेबांच्या बहुमोल योगदानाची महिती देत आदरांजली वाहिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. सुकदेव निंबेकर यांनी केले. सूत्रसंचालन सौ. सुषमा अमृतकर यांनी केले. तर आभार प्रदर्शन सौ. स्वाती भावसार यांनी केले.

### युवा संवाद

दि. ९ एप्रिल २०२५ रोजी स्वामी विवेकानंद सेवा प्रकल्प पिंपळद यांच्या वतीने इ.११ वी च्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित युवा संवाद उपक्रमाचे उद्घाटन उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्वामी विवेकानंद प्रकल्पाचे समन्वयक श्री. निलेश आहेर व कु. वैभवी आहेर यांनी

विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांना स्वामी विवेकानंद सेवा प्रकल्प युवकांसाठी करत असलेले कार्य, शिक्षण आरोग्य या सामाजिक क्षेत्रात केले जाणारे सेवा कार्य या बाबत सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार श्री साहेबराव ठोंबरे यांनी मानले.

**महात्मा फुले जयंती**

दि. ११ एप्रिल २०२४ रोजी 'महात्मा ज्योतिबा फुले' जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे व पर्यवेक्षक श्री. संजय जोशी यांनी प्रतिमा पूजन केले. श्री. मंथन वाळुंज यांनी महात्मा फुले यांचे सामाजिक कार्य सविस्तर विशद केले. मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे यांनी आपल्या मनोगतातून महात्मा फुले यांच्या स्त्री शिक्षणासाठी केलेल्या बहुमोल योगदानाची महिती देत आदरांजली वाहिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. सुकदेव निंबेकर व सूत्रसंचालन सौ. सुषमा अमृतकर यांनी केले. आभार श्रीमती प्रतिभा ठाकूर यांनी मानले.

**श्री हनुमान जयंती**

दि. १२ एप्रिल २०२४ रोजी श्री हनुमान जयंती साजरी करण्यात आली. मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे यांनी प्रतिमा पूजन केले. विद्यार्थ्यांनी मारुती स्तोत्र व हनुमान चालीसा यांचे पठन केले. मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे यांनी आपल्या मनोगतातून श्री हनुमानाची शक्ती, युक्ती स्वामीनिष्ठा हे गुण अंगीकारण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. सुकदेव निंबेकर व सूत्रसंचालन सौ. सुषमा अमृतकर यांनी केले. आभार श्रीमती प्रतिभा ठाकूर यांनी मानले.

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती**

